# LIB 013

ज्ञानगंगा घरोघरी

## ग्रंथालय आणि माहितीशास्त्र : घटना, घडामोडी, भाष्य

**संपादक**

**संचालक मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा**


**कार्यकारी संपादक**

**डॉ. प्रकाश बर्वे**

प्रमुख, ज्ञानस्रोत केंद्र

**संपादक मंडळ**

श्री. नारायण बारसे, ठाणे
डॉ. जगदीश कुलकर्णी, नांदेड
डॉ. शालिनी लिहितकर, नागपूर
डॉ. सिद्धी जगदाळे, मुंबई
डॉ. सारिका सावंत, मुंबई
डॉ. जयंत नंदागवळी, नाशिक



©२०२६ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ



**निर्मिती**

**श्री. विलास बधान, प्रमुख (प्र.)**

ग्रंथनिर्मिती केंद्र

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

**मुद्रक व प्रकाशक**

**डॉ. गोविंद कतलाकुटे, प्र.कुलसचिव**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक 422 222


---

**संपादकीय साहित्य पाठविण्यासाठी**




**ई-मेल : editordnyangangotri@ycmou.ac.in**



❖ या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ व तज्ज्ञ सल्लागार मंडळ सहमत असेलच असे नाही.



**तज्ज्ञ सल्लागार मंडळ**

**डॉ. राजेंद्र कुंभार**

प्राध्यापक, ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे- 411 007

**डॉ. मोहन खेरडे**

संचालक, ज्ञानस्रोत केंद्र

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती- 444 602

**डॉ. रणजीत धर्मापुरीकर**

निवृत्त माहिती शास्त्रज्ञ

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड- 431 602

**डॉ. अनिल चिकाटे**

संचालक, ज्ञानस्रोत केंद्र

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव – 425 401

**डॉ. सुषमा पौडवाल**

निवृत्त ग्रंथपाल

एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई – 400 049

# ज्ञानगंगोत्री

**वर्ष : २६ वे ज्ञानगंगोत्री : मार्च ते मे, २०२६**

**अंक : ४**

**अनुक्रमणिका** **ISSN** 2231- 6507


- हरित ग्रंथालये आणि शाश्वत पद्धती — श्री. यशवंत एस. चौधरी, श्री. हेमंत एस. भोये
- दूरस्थ शिक्षणातील अध्यापन-अध्ययन पद्धती प्रभावी करण्यामध्ये ग्रंथालयांची भूमिका — कु. मोनाली सुनिल गुजराथी, डॉ. सुनंदा फुलारी, डॉ. गजानन घायाळ
- ज्ञान संपत्तीचे जतन : ग्रंथालयसाठा पडताळणीची परिणामकारक प्रक्रिया — सह.प्रा.सौ.गौरी प्रशांत बोराडे
- साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे यांचे वाचन : एक अभ्यास — सुरेखा खरे, प्रा. डॉ. वंदना रवींद्र शेलार

## संपादकीय

'हरित ग्रंथालये आणि शाश्वत पद्धती' या लेखात यशवंत चौधरी व हेमंत भोये यांनी पर्यावरणीय समस्या, हवामान बदल, नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास आणि वाढती लोकसंख्या या जागतिक आव्हानांमुळे शाश्वत विकासाची संकल्पना हा विचार मांडला आहे शिक्षण, संशोधन आणि माहिती प्रसाराची केंद्रे असलेल्या ग्रंथालयांनीही या दिशेने जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर "हरित ग्रंथालये" ही संकल्पना उदयास आली असून ती पर्यावरणपूरक रचना, ऊर्जा व पाणी संवर्धन, डिजिटल माहिती सेवा आणि शाश्वत व्यवस्थापन यांचा समन्वय साधते. या लेखातून त्यांनी 'हरित ग्रंथालये आणि शाश्वत पद्धती' याबाबत माहिती विशद केली आहे.

मोनाली गुजराथी, डॉ. सुनंदा फुलारी व डॉ. गजानन घायाळ यांच्या 'दूरस्थ शिक्षणातील अध्यापन—अध्ययन पद्धती प्रभावी करण्यामध्ये ग्रंथालयांची भूमिका' या लेखानुसार माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे दूरस्थ शिक्षण अधिक लवचिक व सर्वसमावेशक झाले आहे. या शिक्षणपद्धतीत अध्यापन—अध्ययन प्रक्रिया प्रभावी करण्यासाठी ग्रंथालयांची भूमिका महत्त्वाची ठरते. डिजिटल साधनसामग्री, माहिती साक्षरता आणि स्वयं-अध्ययनाच्या माध्यमातून ग्रंथालये विद्यार्थ्यांना ज्ञानसंपादनासाठी आवश्यक आधार देतात. तसेच या लेखात दूरस्थ शिक्षणातील ग्रंथालयांची भूमिका, बदलते स्वरूप, आव्हाने आणि सुधारणा उपायांचा आढावा घेण्यात आला आहे.

'ज्ञान संपत्तीचे जतन: ग्रंथालयसाठा पडताळणीची परिणामकारक प्रक्रिया' या लेखात गौरी प्रशांत बोराडे यांनी ग्रंथालयातील पुस्तके व इतर माहिती संसाधने ही संस्थेची महत्त्वाची संपत्ती असल्यामुळे त्यांची नियमित साठा पडताळणी करणे आवश्यक असते हे नमूद केले आहे. साठा पडताळणीमुळे ग्रंथालयातील साहित्य प्रत्यक्ष उपलब्ध आहे का, नोंदी अचूक आहेत का आणि हरवलेली किंवा नष्ट झालेली पुस्तके कोणती आहेत हे समजते.या प्रक्रियेमुळे ग्रंथालयातील पारदर्शकता, जबाबदारी आणि संग्रह व्यवस्थापन सुधारते. तसेच



साठा पडताळणीच्या अहवालामुळे लेखापरीक्षण सुलभ होते व भविष्यातील खरेदी व सेवा नियोजनासाठी मार्गदर्शन मिळते.

सुरेखा खरे व डॉ. वंदना शेलार यांनी 'साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे यांचे वाचन : एक अभ्यास' या लेखात अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर पडलेला वाचनाचा प्रभाव तसेच त्यांच्या कार्याची ओळख यावर चर्चा केली आहे. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखनातून समाजातील गरीब, वंचित आणि शोषित घटकांचा आवाज मांडत अन्याय व विषमतेवर प्रकाश टाकला आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याने समाजाला जागृती आणि हक्कांसाठी लढण्याची प्रेरणा या लेखात विशद केली आहे. तसेच त्यांनी मराठी साहित्य समृद्ध करत सामाजिक परिवर्तनासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या वाचन सवयीमुळे त्यांच्या विचारसरणी आणि लेखनाला व्यापक दिशा मिळाली.

**कार्यकारी संपादक**

# हरित ग्रंथालये आणि शाश्वत पद्धती

श्री. यशवंत एस. चौधरी
ग्रंथपाल
डिव्हाईन कॉलेज ऑफ फार्मसी , सटाणा
मोब.नं. : 7507669347
Email: yashwantchaudhari4@gmail.com

श्री. हेमंत एस. भोये
ग्रंथपाल
लोकनेते डॉ. जे.डी पवार, कॉलेज ऑफ फार्मसी, कळवण
मोब.नं. : 8055844590
Email:- boyehemnat23@gmail.cpm

## सारांश

हरित ग्रंथालय हे शाश्वत ग्रंथालय म्हणूनही ओळखले जाते, पर्यावरण विषयक चिंता लक्षात घेऊन तयार केलेली ग्रंथालय आहे, हरित ग्रंथालय मोठ्या हरित इमारतीच्या चळवळीचा एक भाग आहे. जगभरात हरित ग्रंथालय बनवली जात आहेत, ग्रंथालय २.० सोबत २१ व्या शतकातील ग्रंथालयाची व्याख्या करणारा ग्रीन डिझाइन हा एक उदयोन्मुख ट्रेंड आहे. पर्यावरणीय समस्या, हवामान बदल, नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास आणि वाढती लोकसंख्या यामुळे शाश्वत विकास ही संकल्पना आज अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. ज्ञान निर्मिती, माहिती प्रसार आणि समाज प्रबोधनाची केंद्रे असलेल्या ग्रंथालयांवर पर्यावरणीय जबाबदारी पार पाडण्याचे महत्त्वाचे दायित्व आहे. "हरित ग्रंथालये" ही



संकल्पना पर्यावरणपूरक इमारत रचना, ऊर्जा व पाणी संवर्धन, डिजिटल व हरित माहिती सेवा, शाश्वत संग्रह विकास आणि पर्यावरण साक्षरता कार्यक्रम यांचा समन्वय साधते. या संशोधन निबंधात हरित ग्रंथालयांची संकल्पना, गरज, वैशिष्ट्ये, ग्रंथालयांमधील शाश्वत पद्धती, शाश्वत विकास उद्दिष्टांशी (SDGs) असलेले नाते, भारतातील व जगातील काही हरित ग्रंथालये आणि अडचणी यांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे.

**संज्ञा** : हरित ग्रंथालये, शाश्वत पद्धती, पर्यावरणीय शाश्वतता, ग्रंथालय व्यवस्थापन, SDGs

## प्रस्तावना

निसर्ग निर्मिती पासूनच मानव आपल्या अस्थित्वासाठी, गरजा भागवण्यासाठी, स्वहितासाठी नैसर्गिक साधन संपत्ती मध्ये हस्तक्षेप करत आला आहे. औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि तंत्रज्ञानाच्या वेगवान विकासामुळे पर्यावरणावर मोठा ताण निर्माण झाला आहे. जागतिक तापमानवाढ, पाणीटंचाई, ऊर्जा संकट आणि जैवविविधतेचा ऱ्हास या समस्या मानवजातीसमोर उभ्या आहेत. या पार्श्वभूमीवर शाश्वत विकासाची संकल्पना पुढे आली. शाश्वत विकास म्हणजे सध्याच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम होणार नाही याची काळजी घेणे. शाश्वत विकासाचा मुख्य उद्देश म्हणजे सध्याच्या पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर कोणताही विपरीत परिणाम होऊ न देणे. शिक्षण, संशोधन आणि माहिती प्रसाराची केंद्रे असलेल्या ग्रंथालयांची भूमिका या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे.

१९९०च्या दशकाच्या सुरुवातीला हरित ग्रंथालयाची चळवळ सुरु झाली आणि ग्रंथालय आणि माहितीशास्त्र व्यवसायात ती लोकप्रिय झाली. पर्यावरण चळवळीत आता ग्रंथालयही मागे नाहीत. ग्रंथालय व्यावसायिक अशा प्रकारचे ग्रंथालय विकसित करण्याचा प्रयत्न करीत आहेत की, ज्यात कमीत कमी वीजेचा वापर, ऊर्जा कार्यक्षमता आणि जे पर्यावरणास अनुकूल असेल. ग्रंथालये ही केवळ माहिती साठवणारी केंद्रे नसून ती सामाजिक परिवर्तनाची प्रभावी साधने आहेत.त्यामुळे ग्रंथालयांनी पर्यावरणपूरक धोरणे स्वीकारून समाजात शाश्वततेबाबत जागृती निर्माण करणे आवश्यक आहे. आजच्या डिजिटल युगात ग्रंथालयांनी पारंपरिक कार्यपद्धतींपलीकडे जाऊन पर्यावरणपूरक धोरणे स्वीकारणे आवश्यक आहे. यामधूनच "हरित ग्रंथालये" ही संकल्पना उदयास आली असून ती पर्यावरण संरक्षण, आर्थिक बचत आणि सामाजिक जबाबदारी यांचा समन्वय साधते.

## हरित ग्रंथालयांची संकल्पना

हरित ग्रंथालये म्हणजे अशी ग्रंथालये जी पर्यावरणास अनुकूल तत्त्वांवर आधारित रचना, उभारणी, व्यवस्थापन आणि सेवा प्रदान करतात. या संकल्पनेचा उद्देश नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षम वापर करून पर्यावरणावरील दुष्परिणाम कमी करणे हा आहे. **International Federation of Library Associations and Institutions (IFLA)** नुसार, हरित ग्रंथालये सामाजिक, शैक्षणिक आणि पर्यावरणीय दृष्ट्या जबाबदार संस्थांप्रमाणे कार्य करतात. [6,7]



पर्यावरण आणि समुदायाचा रक्षण करणाऱ्या हेतूने बनवलेली ग्रंथालये म्हणजे **हरित ग्रंथालय** "हरित किंवा शाश्वत ग्रंथालय म्हणजे अशी रचना जी रचना, बांधणी, नुतीनीकरण, पर्यावरणीय आणि संसाधन कार्यक्षेम पद्धतीने पुन्हा वापरणे होय."

**The online Dictionary of Library and Information Science (ODLIS)** नुसार हरित ग्रंथालय म्हणजे "नैसर्गिक पर्यावरणावर नकारात्मक प्रभाव कमी करण्यासाठी आणि पर्यावरणाची गुणवत्ता वाढविणे, नैसर्गिक बांधकाम साहित्य आणि जैवउत्पादित उत्पादनांचा वापर, उर्जा, पाणी, कागदासारख्या संसाधनांचे संरक्षण त्यांच्या माध्यमाने पर्यावरणीय गुणवत्तावाढविण्यासाठी डिझाईन केलेले ग्रंथालय हरित किंवा शाश्वत ग्रंथालय. हरित ग्रंथालयांची संकल्पना केवळ इमारतीपुरती मर्यादित नसून ती ग्रंथालयाच्या एकूण कार्यपद्धतीशी संबंधित आहे. यात हरित इमारत रचना, ऊर्जा व पाणी व्यवस्थापन, शाश्वत संग्रह विकास, डिजिटल माहिती सेवा, कचरा व्यवस्थापन आणि वापरकर्त्यांच्या वर्तनात सकारात्मक बदल घडवून आणणे यांचा समावेश होतो. हरित ग्रंथालये ही पर्यावरणीय शाश्वततेसोबतच आर्थिकदृष्ट्या किफायतशीर ठरतात, कारण ऊर्जा व संसाधनांचा कार्यक्षम वापर केल्यामुळे दीर्घकालीन खर्चात बचत होते.

## अभ्यासाची उद्दिष्टे (Academic Objectives)

प्रस्तुत संशोधन निबंधाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:

१. हरित ग्रंथालये व शाश्वत पद्धती या संकल्पनेचा सैद्धांतिक अभ्यास करणे.

२. ग्रंथालय व्यवस्थापनात राबवता येणाऱ्या विविध शाश्वत पद्धतींचे विश्लेषण करणे.

३. पर्यावरण संरक्षण व जनजागृतीमध्ये ग्रंथालयांची भूमिका अधोरेखित करणे.

४. शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) आणि ग्रंथालय सेवा यांमधील परस्परसंबंध स्पष्ट करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केलेला असून हा अभ्यास दुय्यम माहिती स्त्रोतांवर आधारित आहे. यामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्स, संशोधन लेख, पुस्तके, IFLA अहवाल, परिषद कार्यवाही, इतर प्रकाशने इत्यादींसह विविध वेबसाइट्सवरून आवश्यक दुय्यम स्त्रोतांद्वारे संशोधन आणि डेटाचे विश्लेषणासाठी लागणारी सामग्री संकलित करण्यात आली आहे. तसेच प्राप्त माहितीचे संकल्पनात्मक विश्लेषण करण्यात आले असून संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांशी संबंधित अधिकृत दस्तऐवजांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधनाची गृहितके (Research Hypotheses)**

प्रस्तुत अभ्यासासाठी खालील गृहितके मांडण्यात आली आहेत:

H1: ग्रंथालयांमध्ये शाश्वत पद्धतींचा अवलंब केल्यास पर्यावरणीय संरक्षणास चालना मिळते.

H2: हरित ग्रंथालये पर्यावरणीय जनजागृती निर्माण करण्यात प्रभावी भूमिका बजावतात.



H3: डिजिटल व हरित माहिती सेवा ग्रंथालयांच्या कार्यक्षमतेत व आर्थिक बचतीत वाढ करतात.

H4: शाश्वत विकास उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी ग्रंथालये महत्त्वपूर्ण सहाय्यक संस्था ठरू शकतात.

**ग्रंथालयांमधील शाश्वत पद्धतींची गरज**

ग्रंथालये ही ज्ञाननिर्मिती व माहिती प्रसाराची केंद्रे असून बदलत्या जागतिक पर्यावरणीय व तांत्रिक परिस्थितीत त्यांच्यासमोर अनेक आव्हाने उभी आहेत. अशा परिस्थितीत ग्रंथालयांमधील शाश्वत पद्धतींचा अवलंब करणे अत्यावश्यक ठरते. परंपरागत पद्धतींमुळे वीज, पाणी, कागद आणि उपकरणांच्या देखभालीवर मोठा खर्च येतो. शाश्वत व्यवस्थापनाद्वारे ऊर्जा बचत, कागदविरहित सेवा, डिजिटल संसाधनांचा वापर आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या पायाभूत सुविधांचा अवलंब केल्यास ग्रंथालयांच्या दैनंदिन व दीर्घकालीन खर्चात लक्षणीय घट होते.

ग्रंथालये या समाजासाठी आदर्श संस्था मानल्या जातात. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाची सामाजिक जबाबदारी स्वीकारणे हे त्यांचे नैतिक कर्तव्य आहे. शाश्वत पद्धतींच्या माध्यमातून ग्रंथालये पर्यावरणीय जनजागृती वाढवू शकतात आणि वाचकांमध्ये जबाबदार व पर्यावरणपूरक वर्तन विकसित करू शकतात. तांत्रिक परिवर्तनाच्या पार्श्वभूमीवर डिजिटल ग्रंथालये, ई-संसाधने, ओपन ॲक्सेस प्लॅटफॉर्म आणि हरित IT (Green ICT) यांचा वापर वाढवणे हीदेखील शाश्वततेची गरज आहे. यामुळे माहितीचा व्यापक व समतोल प्रसार होतो, प्रवास व भौतिक संसाधनांवरील अवलंबित्व कमी होते आणि ज्ञानसामग्रीचे दीर्घकालीन जतन शक्य होते व शाश्वत पद्धतींचा अवलंब

केल्यास ग्रंथालये पर्यावरणपूरक, आर्थिकदृष्ट्या किफायतशीर आणि सामाजिकदृष्ट्या उपयुक्त ठरतात.

**हरित ग्रंथालये आणि शाश्वत पद्धतींची प्रमुख वैशिष्ट्ये**

१. **हरित इमारती आणि उपकरणे (Green Buildings & Equipment):** ऊर्जा-कार्यक्षम प्रकाशयोजना, नैसर्गिक हवा खेळती ठेवणारी रचना, सौरऊर्जेचा वापर आणि पुनर्वापर करण्यायोग्य बांधकाम साहित्य वापरणे.

२. **ऊर्जा आणि पाणी व्यवस्थापन (Energy & Water Management):** कमी वीज वापरणे, पावसाचे पाणी साठवणे (rainwater harvesting) आणि जल-कार्यक्षम उपकरणे वापरणे.

३. **कचरा कमी करणे (Waste Reduction):** कागदाचा कमी वापर करणे, पुनर्वापर (recycling) आणि कंपोस्ट खत तयार करणे.

४. **शाश्वत खरेदी (Sustainable Procurement):** पर्यावरणपूरक आणि स्थानिक उत्पादनांची खरेदी करणे.

५. **डिजिटल संसाधने आणि सेवा (Digital Resources & Services):** कागदाचा वापर टाळण्यासाठी डिजिटल संसाधनांना प्रोत्साहन देणे.

६. **पर्यावरण शिक्षण आणि जागरूकता (Environmental Education & Awareness):** समुदायासाठी पर्यावरणपूरक कार्यक्रम आणि कार्यशाळा आयोजित करणे.



**ग्रंथालयांमधील शाश्वत पद्धती**

ग्रंथालयांमध्ये शाश्वत पद्धतींचा अवलंब केल्यास पर्यावरण संरक्षणासोबतच कार्यक्षम व्यवस्थापन साध्य होते. खालीलप्रमाणे विविध क्षेत्रांत शाश्वत पद्धती राबविता येतात.

१. **हरित इमारत व पायाभूत सुविधा**

ग्रंथालय इमारतींची रचना करताना नैसर्गिक प्रकाश, वायुवीजन आणि उष्णता नियंत्रणाचा विचार करणे आवश्यक आहे. सौरऊर्जा, पवनऊर्जा यांसारख्या नवीकरणीय ऊर्जेचा वापर केल्यास विजेवरील अवलंबित्व कमी होते. पर्यावरणपूरक बांधकाम साहित्याचा वापर हा देखील महत्त्वाचा घटक आहे.

२. **ऊर्जा व्यवस्थापन**

ऊर्जा व्यवस्थापनाच्या दृष्टीने ग्रंथालयांमध्ये ऊर्जा कार्यक्षम प्रकाश व्यवस्था, स्मार्ट सेन्सर प्रणाली, नैसर्गिक प्रकाशाचा समन्वय, सौरऊर्जा तंत्रज्ञान आणि हरित इमारत संकल्पना (Green Building Concept) यांचा वापर करणे आवश्यक ठरते. या उपाययोजनांमुळे कार्बन उत्सर्जनात घट होते तसेच ग्रंथालयांचा दीर्घकालीन कार्यकारी खर्च कमी होतो. संशोधन अभ्यासांनुसार ऊर्जा कार्यक्षम ग्रंथालये पर्यावरण संरक्षणासोबतच आर्थिकदृष्ट्या शाश्वत ठरतात.

३. **पाणी व्यवस्थापन व संसाधन संवर्धन**

पाणी व्यवस्थापन ही शाश्वत ग्रंथालयांची आणखी एक महत्त्वाची बाब आहे. पर्जन्य जलसंधारण, पाणी पुनर्वापर प्रणाली, कमी पाणी

वापरणारी उपकरणे आणि जलस्रोत संवर्धन धोरणे अंगीकारल्यास पाणीटंचाईसारख्या समस्यांवर प्रभावीपणे मात करता येते. ग्रंथालयांद्वारे जलसंवर्धन विषयक माहिती प्रसार केल्यास वापरकर्त्यांच्या वर्तनात सकारात्मक बदल घडून येतो, जो सामाजिक शाश्वततेचा महत्त्वाचा घटक आहे.

४. **शाश्वत संग्रह विकास व डिजिटल रूपांतरण**

संग्रह विकासाच्या दृष्टीने शाश्वततेचा विचार करता डिजिटल संसाधने, ई-पुस्तके, ई-जर्नल्स, ओपन ॲक्सेस साहित्य आणि ओपन एज्युकेशनल रिसोर्सेस (OER) यांचा समावेश अपरिहार्य ठरतो. कागदाधारित संसाधनांवरील अवलंबित्व कमी करून डिजिटल व सामायिक संसाधनांचा वापर वाढविल्यास पर्यावरणीय भार कमी होतो. यासोबतच ग्रंथालय संघटना (Library Consortia) आणि आंतरग्रंथालय कर्ज प्रणालीद्वारे संसाधनांचा कार्यक्षम व शाश्वत वापर शक्य होतो.

५. **हरित माहिती सेवा व तंत्रज्ञान**

डिजिटल संदर्भ सेवा, संस्थात्मक संग्रह, क्लाउड आधारित ग्रंथालय व्यवस्थापन प्रणाली आणि मोबाइल ॲप्स यांमुळे सेवा अधिक कार्यक्षम बनतात. या सेवांमुळे वापरकर्त्यांचा ग्रंथालयाशी संवाद वाढतो तसेच पर्यावरणावर होणारा ताण कमी होतो.

६. **कचरा व्यवस्थापन**

कागदविरहित प्रशासन, कचऱ्याचे वर्गीकरण, पुनर्चक्रण आणि ई-कचऱ्याची सुरक्षित विल्हेवाट या बाबी हरित ग्रंथालयांसाठी व



शाश्वत पद्धतींच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मानवी संसाधन विकास व धोरणात्मक नियोजन अत्यंत आवश्यक आहे. ग्रंथपाल व कर्मचाऱ्यांना शाश्वततेविषयी प्रशिक्षण देणे, संस्थात्मक धोरणे आखणे आणि शाश्वत विकास उद्दिष्टांशी (UN SDGs) सुसंगत उपक्रम राबविणे गरजेचे आहे. अशा प्रकारे ग्रंथालये केवळ माहिती सेवा पुरविणाऱ्या संस्था न राहता शाश्वत विकास प्रक्रियेतील सक्रिय सहभागी म्हणून कार्य करू शकतात.

### पर्यावरणीय जनजागृतीमध्ये ग्रंथालयांची भूमिका

ग्रंथालये ही पर्यावरणीय जनजागृतीसाठी प्रभावी केंद्रे ठरू शकतात. माहिती व ज्ञानाच्या माध्यमातून समाजात पर्यावरणाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याचे कार्य ग्रंथालये करू शकतात.

ग्रंथालयांमध्ये पर्यावरण विषयक पुस्तके, नियतकालिके, डिजिटल साधने उपलब्ध करून वापरकर्त्यांना पर्यावरणीय समस्यांची माहिती दिली जाऊ शकते. कार्यशाळा, परिसंवाद, व्याख्याने, प्रदर्शन आणि चर्चासत्रांच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व अधोरेखित करता येते.

पर्यावरण दिन, पृथ्वी दिन यांसारख्या विशेष दिनांचे आयोजन, शाळा-महाविद्यालयांशी सहकार्य, तसेच स्थानिक समुदायांसोबत संयुक्त उपक्रम राबवून ग्रंथालये समाजात पर्यावरण साक्षरता वाढवू शकतात.

### हरित ग्रंथालयासाठी ग्रंथपालाची भूमिका

१. ग्रंथपालाने इच्छुक लोकांना हरित ग्रंथालयाच्या साधन आणि तंत्रज्ञानासाठी प्रोत्साहन करणे व ऊर्जा कार्यक्षम उपकरणे,

डिजिटल माहिती संसाधने, कागदविरहित सेवा आणि पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा यांचा उपयोग कसा करता येईल याविषयी मार्गदर्शन करून तो शाश्वत ग्रंथालय व्यवस्थापनास चालना देतो.

२. ग्रंथपालाने सोशल मिडीया सारख्या वेगवेगळ्या ऑनलाईन साधनांचा उपयोग करून हरित ग्रंथालय चळवळीच्या निर्मितीसाठी प्रयत्न केले पाहिजे.

३. ईको-ग्रंथालय प्रणाली अंतर्गत ग्रंथपालाने काम केले पाहिजे आणि या प्रकारच्या प्रणालीमध्ये विशेष रुची असणारे विद्यार्थी, संशोधक व व्यावसायिक यांना ओळखून त्यांना सहभागी करून घेणे, स्वयंसेवक गट निर्माण करणे व सहकार्यात्मक उपक्रम राबवणे.

४. सेमिनार, चर्चासत्र आणि व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे हरित ग्रंथालयासाठी इतर ग्रंथपालांना प्रोत्साहित करणे. एकूणच, हरित ग्रंथालयासाठी ग्रंथपालाची भूमिका ही प्रेरक नेतृत्व, तंत्रज्ञान-स्नेही दृष्टीकोन, सामाजिक संवाद आणि शाश्वत विकासाचा सक्रिय सहभाग या चार स्तंभांवर आधारित आहे. या भूमिकेमुळे ग्रंथालये केवळ माहिती केंद्रे न राहता पर्यावरणीय शाश्वततेची प्रभावी केंद्रे बनू शकतात.

## शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) आणि ग्रंथालये

संयुक्त राष्ट्र संघाने 2030 अजेंडाअंतर्गत मांडलेली शाश्वत विकास उद्दिष्टे (Sustainable Development Goals-SDGs) ही सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय विकासाची एकात्मिक चौकट प्रदान करतात. ज्ञाननिर्मिती, माहितीप्रसार आणि समाजजागृती या



मूलभूत कार्यांमुळे ग्रंथालये SDGs अंमलबजावणीत महत्त्वाची भूमिका बजावतात. विशेषतः हरित ग्रंथालयांची संकल्पना पर्यावरणपूरक व्यवस्थापन, शाश्वत सेवा आणि सामाजिक सहभाग यांच्या माध्यमातून SDGs शी थेट व अप्रत्यक्षरीत्या जोडलेली आहे.

**SDG 4: गुणवत्तापूर्ण शिक्षण** या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी ग्रंथालये सर्वसमावेशक, समान आणि आयुष्यभर शिक्षणाला चालना देतात. हरित ग्रंथालयांद्वारे डिजिटल संसाधने, ओपन ॲक्सेस साहित्य, ओपन एज्युकेशनल रिसोर्सेस (OER) आणि ई-लर्निंग सुविधा उपलब्ध करून शिक्षणाचा दर्जा उंचावला जातो. यामुळे शिक्षण अधिक सुलभ, किफायतशीर आणि पर्यावरणपूरक बनते. माहिती साक्षरता, डिजिटल साक्षरता आणि पर्यावरणीय साक्षरतेच्या माध्यमातून ग्रंथालये ज्ञानाधारित समाज निर्मितीस हातभार लावतात.

**SDG 11: शाश्वत शहरे व समुदाय** या उद्दिष्टाच्या संदर्भात ग्रंथालये समुदाय-केंद्रित संस्था म्हणून कार्य करतात. हरित इमारत संकल्पना, ऊर्जा कार्यक्षम पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक वापरासाठी खुल्या जागा यांमुळे ग्रंथालये शाश्वत शहरी विकासाचा भाग बनतात. स्थानिक समुदायांसाठी पर्यावरण विषयक माहिती, चर्चासत्रे आणि सहकार्यात्मक उपक्रम राबवून ग्रंथालये सामाजिक एकात्मता आणि शाश्वत समुदाय विकासाला प्रोत्साहन देतात.

**SDG 12: जबाबदार उपभोग व उत्पादन** या उद्दिष्टाशी हरित ग्रंथालयांचा थेट संबंध आहे. कागदविरहित प्रशासन, डिजिटल संग्रह, संसाधन सामायिकीकरण, पुनर्वापर व पुनर्चक्रण धोरणे आणि जबाबदार

खरेदी प्रक्रिया यांद्वारे ग्रंथालये संसाधनांचा विवेकपूर्ण वापर करतात. ग्रंथालय संघटन (Consortia) आणि आंतरग्रंथालय सहकार्यामुळे माहिती संसाधनांचा अतिरेक टाळता येतो, जो शाश्वत उपभोगाचा महत्त्वाचा घटक आहे.

**SDG 13: हवामान कृती** या उद्दिष्टाच्या पूर्ततेत हरित ग्रंथालयांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. ऊर्जा बचत, कार्बन उत्सर्जन कमी करणे, नूतनीकरणीय ऊर्जेचा वापर आणि हरित आयटी (Green IT) पद्धती अंगीकारून ग्रंथालये हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जाण्यास सक्रिय योगदान देतात. यासोबतच हवामान बदल, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकास विषयक माहितीप्रसार व जनजागृती उपक्रमांद्वारे ग्रंथालये समाजात सकारात्मक बदल घडवून आणतात.

अशा प्रकारे हरित ग्रंथालये SDG 4, SDG 11, SDG 12 आणि SDG 13 या उद्दिष्टांशी सुसंगत कार्य करताना शाश्वत विकासाच्या जागतिक प्रयत्नांना स्थानिक स्तरावर बळकटी देतात. त्यामुळे ग्रंथालये केवळ माहिती सेवा पुरविणाऱ्या संस्था न राहता शाश्वत विकास प्रक्रियेतील रणनीतिक भागीदार म्हणून उदयास येतात.

### भारतातील काही हरित ग्रंथालये

१) **National Library of India, Kolkata:** ही भारतातील सर्वात मोठी लायब्ररी असून, तिच्या परिसरात मोठ्या प्रमाणात हिरवळ आणि झाडे आहेत, जी पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत करतात.

२) **Calcutta University Library:** शैक्षणिक आणि संशोधन ग्रंथालय असून ऊर्जा कार्यक्षम उपकरणे आणि स्मार्ट



प्रकाशयोजना, पर्यावरणीय जनजागृतीसाठी कार्यशाळा व प्रदर्शनांचे आयोजन करते.

३) **Madras University Library:** प्राचीन आणि प्रतिष्ठित शैक्षणिक ग्रंथालय असून ग्रंथालयाची शाश्वत इमारत रचना आणि ऊर्जा बचत तंत्रज्ञान अंगीकारलेले आहे. ग्रंथालयात ई-ग्रंथालय सुविधा, ओपन ॲक्सेस रिसोर्सेस वापर तसेच कचरा व्यवस्थापन आणि पुनर्वापर धोरणांचा अवलंब केला जातो.

४) **YCMOU University Library Nashi**k:-दुरशिक्षण व डिजिटल शिक्षणासाठी अग्रगण्य असलेले ग्रंथालय आहे. माहिती तंत्रज्ञान पद्धती आणि डिजिटल संदर्भ सेवा तसेच पाणी व ऊर्जा बचत उपाय, पर्यावरणपूरक धोरणे, विद्यार्थी आणि समाजासाठी पर्यावरणीय शाश्वतता कार्यक्रमांचे आयोजन करतात.

५) **Karnataka University Library:** कर्नाटक विद्यापीठ ग्रंथालय, धारवाड: हे नैसर्गिक प्रकाश, पाणी संवर्धन आणि शांत वातावरणासाठी प्रसिद्ध, जेथे विद्यार्थी निसर्गाच्या सान्निध्यात अभ्यास करू शकतात.

६) **Anna-Centenary Library, Chennai:** अण्णा शताब्दी ग्रंथालय, चेन्नई हे आशियातील पहिले LEED गोल्ड रेटेड ग्रंथालय आहे, जे ऊर्जा कार्यक्षमतेसाठी ओळखले जाते.

७) **Perma Karpo Library, Ladakh:** पेर्मा कार्पो लायब्ररी, लडाख ही सौर पॅनेल आणि सुंदर बागेसह पर्यावरणास अनुकूल डिझाइनचे उदाहरण असलेले ग्रंथालय आहे.

८) **Mumbai University Library, Mumbai :** ही लाकडी बांधकाम आणि नैसर्गिक प्रकाशाचा जास्तीत जास्त वापर करून तयार करण्यात आलेले ग्रंथालय आहे.

९) **NIT, Library Silchar Assam, India:** NIT ग्रंथालय, सिलचर हे LEED प्रमाणपत्रासाठी डिझाइन केलेले, जेथे नवीन इमारत हरित तंत्रज्ञानाचा वापर करते.

१०) **Delhi University Library:** दिल्ली विद्यापीठ ग्रंथालय नैसर्गिकरित्या थंड आणि आरामदायक इमारतीसाठी ओळखले जाते.

## जगातील काही हरित ग्रंथालये

- Osining Public Library, New York.
- National Library, Singapore.
- Kilton Public Library, West Lebanon.
- Public Library of Charlotte and Mecklenburg Country.
- University of California, Merced Kolligian Library.
- Dexter Library, Ashland.
- Candler Library, Emory University, Atlanta, GA.
- Children's Museum of Pittsburgh.
- Harper Woods Public Library.
- Eden Prairie Library, Eden Prairie.
- Minneapolis Public Library.
- Council Tree Library, Fort Collins, Co.



## हरित ग्रंथालयांच्या अंमलबजावणीतील अडचणी

- हरित पायाभूत सुविधांचा जास्त प्रारंभिक खर्च
- प्रशिक्षित मनुष्यबळाचा अभाव
- निधी व धोरणात्मक मर्यादा
- तांत्रिक सुविधांचा अभाव

## निष्कर्ष

हरित ग्रंथालये ही आधुनिक ग्रंथालय व्यवस्थापनाची शाश्वत व समाजोपयोगी संकल्पना आहे. ग्रंथालयांमध्ये ऊर्जा संवर्धन, पाणी व्यवस्थापन, डिजिटल सेवा, शाश्वत संग्रह विकास आणि पर्यावरणीय जनजागृती कार्यक्रम राबविल्यास पर्यावरण संरक्षणास मोठ्या प्रमाणात हातभार लागू शकतो.

या अभ्यासातून मांडलेली गृहितके सैद्धांतिकदृष्ट्या योग्य ठरतात आणि हरित ग्रंथालय संकल्पना शाश्वत विकास उद्दिष्टांशी सुसंगत असल्याचे दिसून येते. तथापि, हरित पायाभूत सुविधांचा खर्च, प्रशिक्षित मनुष्यबळाचा अभाव आणि धोरणात्मक मर्यादा या अडचणी दूर करण्यासाठी शासकीय व संस्थात्मक पातळीवर ठोस प्रयत्नांची आवश्यकता आहे. एकूणच, ग्रंथालये ही केवळ माहिती केंद्रे न राहता पर्यावरणीय परिवर्तनाची प्रभावी साधने बनू शकतात. त्यामुळे भविष्यातील ग्रंथालय धोरणे व नियोजन करताना हरित व शाश्वत दृष्टीकोन स्वीकारणे अत्यावश्यक आहे.

## संदर्भ सूची

Antonelli, M. (2008). The Green Library Movement: an overview of green library literature and actions from 1979 to the future of green libraries. Electronic Green Journal, 1 (27), 1-11.

Aulisio, G. (2013). Green libraries: Sustainable building and practice. Library Journal.

Bates, M. (1991) The design of browsing and berrypicking techniques for the online search interface. Online Review 13, 407-424.

Choudhury, S. (2015). Green Library: scope and implications at the national and international level. Retrived from http://www.slideshare, Net/ksatpathy/wnl-165-green-libraries-by-sonali choudhry.

Hauke, P., Grunwald, M., Wilde, - (2014). Green Libraries Coming Up! National and IFLA https://www.ifla.org/g/environment-sustainability-and-libraries/ifla-green-library-definition/

IFLA. (2016). Access and opportunity for all: How libraries contribute to the United Nations 2030 agenda. International Federation of Library Associations and Institutions.

International initiatives fostering environmental sustainable libraries and library services.

In BOBC-TSSS 2014 (1-7) Retrieved from

Jankowska, M. A. (2010) Sustainability in libraries:

Practices and challenges. Library Trends, 58(4), 579-598.



Rajesh S. Lokhande (2022) Green Library: Sustainable Development International Journal of Reviews and Research in Social Sciences.10 (03), 107-110.

Roy Pratik Kanti (2025) Green Library Initiative and Sustainable Development by Birchandra State CentralLibrary in Tripura: A Case Study International Journal of Research in Library Science (IJRLS) ISSN: 2455-104X, 14 (04), 75-78.

Shukla, P. (2014, January 14) Green Building Materials. Retrieved from https://www.slideshare.net/pulkitshukl/green-building-materials-30035938

Tseng, S. (2008). Green Library design and evaluation: the Tapei Public Library, Taiwan. New Library World. 109(7/8). 321-336.

रा. प. देशमुख, (2018). ग्रंथालय व्यवस्थापन आणि आधुनिक प्रवाह. पुणे: कॉन्टिनेंटल प्रकाशन.

स. अ.पाटील, (2020) "शाश्वत विकास आणि शैक्षणिक संस्था." मराठी संशोधन पत्रिका, 12(2), 45—52.

विनोद मुकुंद होले, (2018) हरित ग्रंथालय : काळाची गरज, ज्ञानगंगोत्री, य.च.म.मु.वि. नाशिक वर्ष १९ वे, अंक १ जून ऑगस्ट २०१८.

# दूरस्थ शिक्षणातील अध्यापन-अध्ययन पद्धती प्रभावी करण्यामध्ये ग्रंथालयांची भूमिका

**कु. मोनाली सुनिल गुजराथी**
ग्रंथालय सहाय्यक
सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, पुणे
ई-मेल - gujarathim121@gmail.com

**डॉ. सुनंदा फुलारी**
ग्रंथपाल
एम आय टी अकॅडमी ऑफ इंजिनिरिंग, आळंदी
ई-मेल - ssphulari@gmail.com

**डॉ. गजानन घायाळ**
ग्रंथपाल
श्रीमती. सिंधुताई जाधव आर्टस् अँड सायन्स महाविद्यालय, मेहकर

**सारांश**

आधुनिक शिक्षणव्यवस्थेत दूरस्थ शिक्षणाला महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या (ICT) प्रगतीमुळे शिक्षण अधिक लवचिक, सुलभ आणि सर्वसमावेशक झाले आहे. तथापि, दूरस्थ शिक्षणाची गुणवत्ता प्रभावी अध्यापन—अध्ययन पद्धती आणि शैक्षणिक आधारव्यवस्थेवर अवलंबून असते. या संदर्भात ग्रंथालये महत्त्वाची भूमिका बजावतात. डिजिटल साधनसामग्री, माहिती साक्षरता आणि स्वयं-अध्ययनाला प्रोत्साहन देऊन ग्रंथालये अध्यापन-



अध्ययन प्रक्रियेला बळकटी देतात. हा संशोधन लेख दूरस्थ शिक्षणामध्ये अध्यापन-अध्ययन पद्धती प्रभावी करण्यासाठी ग्रंथालयांची भूमिका, त्यांचे बदलते स्वरूप, आव्हाने आणि सुधारणा उपायांचा अभ्यास करतो.

**संज्ञा** : दूरस्थ शिक्षण, अध्यापन-अध्ययन पद्धती, ग्रंथालये, डिजिटल साधनसामग्री, माहिती साक्षरता

## प्रस्तावना

माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या झपाट्याने झालेल्या विकासामुळे शिक्षणाच्या पारंपरिक संकल्पनांमध्ये आमूलाग्र बदल झाले आहेत. दूरस्थ शिक्षण ही शिक्षणाची एक प्रभावी आणि लोकप्रिय पद्धत बनली आहे. भौगोलिक अंतर, वेळेची मर्यादा आणि सामाजिक अडथळे दूर करून शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य दूरस्थ शिक्षण करते.

या बदलत्या शिक्षणपद्धतीत अध्यापन-अध्ययन पद्धती शिक्षक-केंद्रित न राहता विद्यार्थी-केंद्रित बनल्या आहेत. अशा परिस्थितीत ग्रंथालये ही केवळ पुस्तके साठवणारी केंद्रे न राहता, ज्ञान, माहिती आणि तंत्रज्ञानाची सशक्त केंद्रे बनली आहेत. त्यामुळे दूरस्थ शिक्षणात अध्यापन—अध्ययन प्रक्रिया प्रभावी करण्यासाठी ग्रंथालयांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.

## दूरस्थ शिक्षणातील अध्यापन-अध्ययन पद्धती

दूरस्थ शिक्षण ही आधुनिक शिक्षणव्यवस्थेतील एक महत्त्वाची आणि प्रभावी पद्धत आहे. या शिक्षणपद्धतीत शिक्षक व विद्यार्थी भौगोलिकदृष्ट्या वेगवेगळ्या ठिकाणी असतात. त्यामुळे पारंपरिक

वर्गशिक्षणापेक्षा दूरस्थ शिक्षणातील अध्यापन-अध्ययन पद्धती वेगळ्या, लवचिक आणि तंत्रज्ञानाधारित असतात.

दूरस्थ शिक्षणातील अध्यापन—अध्ययन पद्धतींचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये स्वयं-अध्ययनाची सवय निर्माण करणे, सक्रिय सहभाग वाढवणे आणि अध्ययन प्रक्रिया परिणामकारक बनवणे हा आहे.

## २.१ विद्यार्थी-केंद्रित अध्यापन पद्धती

दूरस्थ शिक्षणात अध्यापन प्रक्रिया विद्यार्थी-केंद्रित असते. शिक्षक माहिती देणारा न राहता मार्गदर्शक, समन्वयक आणि प्रेरक म्हणून कार्य करतो. विद्यार्थी स्वतःच्या गतीने, आवडीने आणि क्षमतेनुसार अध्ययन करतो.

## २.२ स्वयं-अध्ययनावर भर

दूरस्थ शिक्षणात स्वयं-अध्ययनाला विशेष महत्त्व दिले जाते. अभ्याससाहित्य, ई-सामग्री, व्हिडिओ व्याख्याने आणि ऑनलाइन साधनांच्या मदतीने विद्यार्थी स्वतंत्रपणे अध्ययन करतो. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये जबाबदारीची जाणीव आणि आत्मविश्वास वाढतो.

## २.३ तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर

माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) हे दूरस्थ शिक्षणाचे मुख्य साधन आहे. लर्निंग मॅनेजमेंट सिस्टिम (LMS), व्हर्च्युअल क्लासरूम, ई-मेल, चर्चा मंच (Discussion Forums) यांचा उपयोग अध्यापन—अध्ययन प्रक्रियेत केला जातो.



## २.४ संवादात्मक व सहभागात्मक अध्ययन

दूरस्थ शिक्षण ही एकमार्गी प्रक्रिया नसून संवादात्मक असते. ऑनलाइन चर्चा, वेबिनार, समूहकार्य आणि प्रश्नोत्तरे यांद्वारे विद्यार्थी—विद्यार्थी व विद्यार्थी—शिक्षक संवाद साधला जातो. यामुळे सहकार्यात्मक अध्ययनास चालना मिळते.

## २.५ सातत्यपूर्ण मूल्यमापन

दूरस्थ शिक्षणातील मूल्यमापन हे सातत्यपूर्ण आणि लवचिक असते. ऑनलाइन चाचण्या, असाइनमेंट्स, प्रकल्पकार्य आणि स्वमूल्यमापन याद्वारे विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यमापन केले जाते. त्वरित अभिप्रायामुळे अध्ययन सुधारण्यास मदत होते.

## २.६ अध्ययन साहित्याची विविधता

दूरस्थ शिक्षणात छापील पुस्तके, ई-पुस्तके, ऑडिओ—व्हिडिओ सामग्री, डिजिटल ग्रंथालये आणि मुक्त शैक्षणिक साधनसामग्री (OER) यांचा वापर केला जातो. ही विविधता विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या अध्ययन शैलींना पूरक ठरते.

## २.७ लवचिकता आणि सर्वसमावेशकता

दूरस्थ शिक्षणातील अध्यापन—अध्ययन पद्धती या लवचिक, स्वयं-अध्ययनावर आधारित आणि तंत्रज्ञान-सहाय्यित असतात. या पद्धतीत शिक्षक मार्गदर्शकाची भूमिका बजावतो, तर विद्यार्थी सक्रिय सहभागातून ज्ञाननिर्मिती करतो.

**दूरस्थ शिक्षणातील प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत**

१) **विद्यार्थी-केंद्रित व स्वयं-अध्ययनावर भर**

दूरस्थ शिक्षणात विद्यार्थ्याला केंद्रस्थानी ठेवले जाते. विद्यार्थी स्वतःच्या गतीने, वेळेनुसार व क्षमतेनुसार अभ्यास करू शकतो. स्वयं-अध्ययन साहित्य (Self Learning Material- SLM) उपलब्ध असल्यामुळे शिक्षकांवर पूर्णतः अवलंबून न राहता विद्यार्थ्यांमध्ये आत्मनिर्भरता, आत्मशिस्त व जबाबदारीची भावना विकसित होते.

२) **डिजिटल माध्यमांचा वापर**

या शिक्षणपद्धतीत व्हिडिओ व्याख्याने, ई-पुस्तके, ई-सामग्री, पॉडकास्ट, ऑनलाइन वर्ग, मोबाईल ॲप्स इत्यादी डिजिटल साधनांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. त्यामुळे शिक्षण अधिक आकर्षक, समजण्यास सोपे व अद्ययावत बनते. भौगोलिक अंतराचा अडथळा दूर होतो.

३) **सातत्यपूर्ण मूल्यमापन व अभिप्राय**

दूरस्थ शिक्षणात असाइनमेंट्स, ऑनलाइन चाचण्या, प्रकल्प, क्विझ यांद्वारे सातत्यपूर्ण मूल्यमापन केले जाते. यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा सातत्याने आढावा घेतला जातो. शिक्षकांकडून मिळणारा अभिप्राय विद्यार्थ्यांना चुका सुधारण्यास व अध्ययन अधिक परिणामकारक करण्यास मदत करतो.



४) **संवादात्मक व सहयोगी अध्ययन**

ऑनलाइन चर्चा मंच, व्हर्च्युअल वर्ग, ई-मेल, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग, ग्रुप प्रोजेक्ट्स यांच्या माध्यमातून शिक्षक-विद्यार्थी तसेच विद्यार्थी-विद्यार्थी यांच्यात संवाद साधला जातो. त्यामुळे सहयोगी अध्ययन घडून येते, विचारांची देवाणघेवाण होते व सामाजिक कौशल्यांचा विकास होतो. या पद्धती प्रभावीपणे राबवण्यासाठी दर्जेदार शैक्षणिक साधनसामग्री आवश्यक असते, जी ग्रंथालयांमार्फत उपलब्ध होते.

**दूरस्थ शिक्षणातील ग्रंथालयांचे बदलते स्वरूप**

**३.१ पारंपरिक ग्रंथालय ते डिजिटल ग्रंथालय**

पूर्वी ग्रंथालये छापील पुस्तकांपुरती मर्यादित होती. परंतु डिजिटल तंत्रज्ञानामुळे ग्रंथालयांचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. डिजिटल ग्रंथालयांमुळे विद्यार्थी कुठेही आणि केव्हाही माहिती मिळवू शकतात.

**३.२ दूरस्थ शिक्षणासाठी ग्रंथालय सेवा**

दूरस्थ शिक्षणामध्ये ग्रंथालयाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पारंपरिक ग्रंथालय सेवांसोबतच तंत्रज्ञानाधारित सेवा पुरवून ग्रंथालये दूरस्थ शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेला प्रभावीपणे सहाय्य करतात. या सेवा पुढीलप्रमाणे सविस्तर समजावून घेता येतील.

१) **ई-पुस्तके, ई-नियतकालिके व डेटाबेस**

दूरस्थ शिक्षणातील विद्यार्थ्यांना छापील ग्रंथालयात प्रत्यक्ष येणे शक्य नसते. अशा वेळी ई-पुस्तके, ई-नियतकालिके व विविध शैक्षणिक डेटाबेस विद्यार्थ्यांना २४x७ उपलब्ध करून दिले

जातात. यामुळे अद्ययावत व विश्वासार्ह माहिती सहज मिळते आणि संशोधनात्मक अभ्यासास चालना मिळते.

२) **मुक्त शैक्षणिक साधनसामग्री (Open Educational Resources – OER)**

ग्रंथालये मोफत व मुक्त परवाना असलेली शैक्षणिक साधने जसे की ई-पाठ्यपुस्तके, व्हिडिओ व्याख्याने, अभ्यासक्रम सामग्री इत्यादी उपलब्ध करून देतात. OER मुळे शिक्षणाचा खर्च कमी होतो आणि सर्व विद्यार्थ्यांना समान शैक्षणिक संधी मिळते.

३) **संस्थात्मक डिजिटल संग्रह (Institutional Repositories)**

संस्थात्मक डिजिटल संग्रहामध्ये संशोधन प्रबंध, प्रकल्प अहवाल, शोधनिबंध, परिषद कार्यवाही इत्यादी साहित्य संग्रहित केले जाते. दूरस्थ शिक्षणातील विद्यार्थ्यांना या संग्रहाचा उपयोग करून दर्जेदार संदर्भ साहित्य मिळते आणि त्यांच्या अभ्यास व संशोधनाला दिशा मिळते.

४) **आभासी संदर्भ सेवा व ऑनलाइन मार्गदर्शन**

ई-मेल, चॅट, व्हिडिओ कॉल किंवा ऑनलाइन पोर्टलद्वारे ग्रंथपाल विद्यार्थ्यांना माहिती शोधण्यात मार्गदर्शन करतात. संदर्भ सेवा आभासी स्वरूपात उपलब्ध असल्यामुळे विद्यार्थी कुठेही असले तरी त्यांना त्वरित मदत मिळते.

५) **माहिती साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रम**

ग्रंथालये माहिती साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना माहिती शोधण्याच्या कौशल्यांचे, माहितीचे मूल्यमापन



करण्याचे व योग्य वापराचे प्रशिक्षण देतात. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचारसरणी विकसित होते आणि माहितीचा प्रभावी उपयोग करता येतो.

**अध्यापन—अध्ययन पद्धती सुधारण्यात ग्रंथालयांची भूमिका**

**४.१ विद्यार्थी-केंद्रित अध्ययनाला प्रोत्साहन**

ग्रंथालये विविध प्रकारची साधनसामग्री उपलब्ध करून विद्यार्थ्यांमध्ये स्वयं-अध्ययनाची सवय विकसित करतात.

**४.२ माहिती साक्षरतेचा विकास**

योग्य माहिती शोधणे, तिचे मूल्यमापन करणे आणि प्रभावी वापर करणे या कौशल्यांचा विकास ग्रंथालयांच्या माध्यमातून होतो.

**४.३ शिक्षक व अभ्यासक्रमासाठी सहाय्य**

ग्रंथालये शिक्षकांना अभ्यासक्रमाशी संबंधित अद्ययावत साधनसामग्री, संशोधन सहाय्य आणि अध्यापनासाठी आवश्यक संसाधने पुरवतात.

१. **दूरस्थ शिक्षणातील ग्रंथालयांसमोरील आव्हाने**

दूरस्थ शिक्षणाच्या वाढत्या प्रभावामुळे ग्रंथालयांची भूमिका अधिक महत्त्वाची झाली आहे. मात्र, या प्रक्रियेत ग्रंथालयांसमोर विविध आव्हाने उभी राहतात. खालीलप्रमाणे या अडचणींचे सविस्तर स्पष्टीकरण देता येईल:

- **डिजिटल साधन सुविधांची कमतरता**

  दूरस्थ शिक्षणासाठी ई-पुस्तके, ई-जर्नल्स, ऑनलाइन डेटाबेस, डिजिटल रिपॉझिटरीज यांसारख्या साधनांची आवश्यकता असते.

अनेक ग्रंथालयांकडे पुरेशी संगणक व्यवस्था, अद्ययावत सॉफ्टवेअर किंवा डिजिटल सामग्री उपलब्ध नसते. त्यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक अध्ययन साहित्य सहज मिळत नाही.

- **इंटरनेट उपलब्धतेतील असमानता**

  ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना इंटरनेट सुविधा मर्यादित प्रमाणात उपलब्ध असते. कमी गतीचे इंटरनेट, वारंवार खंडित होणारी सेवा किंवा आर्थिक मर्यादा यामुळे ऑनलाइन ग्रंथालय सेवांचा लाभ सर्व विद्यार्थ्यांना समानरीत्या मिळत नाही.

- **विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथालय सेवांबाबत जागरूकतेचा अभाव**

  अनेक विद्यार्थ्यांना डिजिटल ग्रंथालय सेवा, ऑनलाइन कॅटलॉग, ई-संसाधनांचा वापर कसा करायचा याची माहिती नसते. योग्य मार्गदर्शन आणि प्रशिक्षणाअभावी उपलब्ध सुविधा असूनही त्यांचा प्रभावी वापर होत नाही.

- **ग्रंथपालांना तांत्रिक प्रशिक्षणाची गरज**

  दूरस्थ शिक्षणासाठी ग्रंथपालांना माहिती व तंत्रज्ञानाशी संबंधित कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक असते. डिजिटल सामग्री व्यवस्थापन, ऑनलाइन संदर्भ सेवा, ई-लर्निंग प्लॅटफॉर्मचा वापर यासाठी विशेष प्रशिक्षणाची आवश्यकता असते, जी अनेकदा अपुरी ठरते.

- **आर्थिक व परवाना संबंधित अडचणी**

  ई-संसाधनांची खरेदी, डेटाबेस सदस्यता आणि परवाने यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद लागते. अनेक शैक्षणिक



संस्थांकडे मर्यादित बजेट असल्यामुळे सर्व आवश्यक डिजिटल साधने उपलब्ध करून देणे शक्य होत नाही.

## २. सुधारणा व उपाययोजना

दूरस्थ शिक्षणात ग्रंथालयांची भूमिका अधिक सक्षम करण्यासाठी सुधारणा व उपाययोजना पुढीलप्रमाणे देता येईल:

- **डिजिटल ग्रंथालय पायाभूत सुविधांचा विकास**

  दूरस्थ शिक्षणासाठी प्रभावी डिजिटल ग्रंथालय तयार करणे अत्यावश्यक आहे. यात ई-पुस्तके, ई-जर्नल्स, ऑनलाइन डेटाबेस, डिजिटल रिपॉझिटरीज आणि बहुभाषिक सामग्रीचा समावेश असावा. तसेच, ग्रंथालयास पर्याप्त संगणक, स्कॅनर, प्रिंटर आणि सर्व्हर सुविधा असाव्यात. यामुळे विद्यार्थ्यांना कोणत्याही वेळी व कोणत्याही ठिकाणाहून अध्ययन साहित्याचा लाभ घेता येईल.

- **ग्रंथपाल व शिक्षकांसाठी सतत प्रशिक्षण कार्यक्रम**

  ग्रंथपाल व शिक्षकांना डिजिटल साधनसुविधांचा प्रभावी वापर करण्यासाठी नियमित प्रशिक्षण आवश्यक आहे. यात माहिती तंत्रज्ञान कौशल्ये, डिजिटल संदर्भ सेवा, ऑनलाइन डेटाबेस शोध, ओपन एक्सेस संसाधनांचा उपयोग व ई-लर्निंग साधनांचा समावेश असावा. सतत प्रशिक्षणामुळे नवीन तंत्रज्ञान व पद्धतींशी जुळवून घेणे सोपे होते.

- **विद्यार्थ्यांसाठी माहिती साक्षरता व ग्रंथालय अभिमुखता कार्यक्रम**
  विद्यार्थ्यांना डिजिटल ग्रंथालयाची सेवा कशी वापरायची, संदर्भ शोध कसा करायचा, स्रोतांचे मूल्यांकन कसे करायचे याबाबत माहिती देणारे कार्यक्रम राबवणे आवश्यक आहे. माहिती साक्षरतेसह ग्रंथालयाभिमुखता कार्यक्रम विद्यार्थ्यांना स्वावलंबी अभ्यासक बनवतात आणि उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर सुनिश्चित करतात.
- **शिक्षक, ग्रंथपाल व अभ्यासक्रम रचनाकार यांच्यात समन्वय**
  ग्रंथालये आणि शिक्षक व अभ्यासक्रम रचनाकार यांच्यात घनिष्ठ समन्वय असावा. त्यामुळे अभ्यासक्रमानुसार आवश्यक साहित्य आधीच उपलब्ध करून देता येईल. तसेच, विद्यार्थ्यांना संदर्भ साहित्य शोधताना मार्गदर्शन मिळते आणि अभ्यासक्रम व संसाधन यांचे एकसंध व्यवस्थापन साधता येते.
- **मुक्त प्रवेश (Open Access) व OER चा अधिक वापर**
  Open Access (मुक्त प्रवेश) साहित्य व OER (Open Educational Resources) चा वापर वाढवून आर्थिक व प्रवेश अडचणी कमी करता येतात. हे संसाधने विद्यार्थ्यांना मोफत उपलब्ध होतात, डिजिटल स्वरूपात सहज प्रवेशयोग्य असतात आणि विविध भाषांमध्ये उपलब्ध असल्यामुळे शैक्षणिक समावेश सुधारतो. यामुळे संस्थात्मक खर्चही कमी होतो आणि सर्व विद्यार्थ्यांसाठी समतोल शिक्षण सुनिश्चित होते.



## ३. निष्कर्ष

दूरस्थ शिक्षणातील अध्यापन—अध्ययन पद्धती प्रभावी करण्यामध्ये ग्रंथालयांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. ग्रंथालये ज्ञानप्राप्तीचे केंद्र, माहिती साक्षरतेची साधने आणि स्वयं-अध्ययनाचे आधारस्तंभ म्हणून कार्य करतात. डिजिटल युगात ग्रंथालये ही दूरस्थ शिक्षणाची अविभाज्य घटक बनली आहेत. तंत्रज्ञान-सक्षम व विद्यार्थी-केंद्रित ग्रंथालय सेवा विकसित केल्यास दूरस्थ शिक्षणाची गुणवत्ता निश्चितच वाढू शकते.

## संदर्भ


Anderson, T., & Dron, J. (2011). Three generations of distance education pedagogy. *International Review of Research in Open and Distance Learning, 12*(3). (https://doi.org/10.19173/irrodl.v12i3.890)

Indira Gandhi National Open University. (n.d.). *Official website*. Retrieved from [https://www.ignou.ac.in/] (https://www.ignou.ac.in/)

Mubofu, C., & Mambo, H. L. (2025). The role of public libraries in enhancing adult education: Experience from Tanzania Library Service Board. *Public Library Quarterly, 44*(1), 55—73.

University Grants Commission - Distance Education Bureau. (n.d.). *Official website*. Retrieved from [https://deb.ugc.ac.in/] (https://deb.ugc.ac.in/)

Yashwantrao Chavan Maharashtra Open University. (n.d.). *Official website*. Retrieved from [https://www.ycmou.ac.in/]



# ज्ञान संपत्तीचे जतन : ग्रंथालयसाठा पडताळणीची परिणामकारक प्रक्रिया

**सह. प्रा. सौ. गौरी प्रशांत बोराडे,**
ग्रंथपाल,
गोखले एज्युकेशन सोसायटीचे सर डॉ. मो. स. गोसावी तंत्रनिकेतन,
नाशिकरोड, नाशिक – ४२२ १०१.

**गोषवारा**

ग्रंथालय हे ज्ञानाचे भांडार आणि विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाचे प्रमुख केंद्र असते. त्यामधील प्रत्येक पुस्तक, जर्नल, मासिक, प्रबंध, सीडी, ई-बुक आणि ई-संसाधन ही संस्थेची मौल्यवान संपत्ती असते. या सर्व साधनांचा योग्य उपयोग होण्यासाठी त्यांची नोंद, जतन आणि तपासणी नियमितपणे केली जाणे अत्यावश्यक असते. साठा पडताळणी म्हणजे ग्रंथालयातील सर्व साहित्य प्रत्यक्ष उपलब्ध आहे का, त्याची नोंद अचूक आहे का, हे तपासण्याची प्रणालीबद्ध प्रक्रिया. ही प्रक्रिया ग्रंथालयातील मालमत्तेचे संरक्षण करते आणि हरवलेल्या किंवा नष्ट झालेल्या साहित्याचा शोध घेण्यास मदत करते. साठा पडताळणीमुळे ग्रंथालयाची पारदर्शकता, जबाबदारी आणि विश्वासार्हता वाढते. तसेच ग्रंथपालाला संग्रह व्यवस्थापन, नव्या खरेदीसाठी नियोजन, व उपयोगकर्त्यांच्या गरजेनुसार सेवा सुधारण्यास मदत मिळते. म्हणूनच साठा पडताळणी ही केवळ औपचारिक कार्यवाही नसून, ग्रंथालय व्यवस्थापनातील शिस्त, दक्षता आणि उत्तरदायित्वाचे प्रतीक आहे.

**साठा पडताळणीचे उद्दिष्टे**

१. **ग्रंथालयातील सर्व पुस्तके प्रत्यक्ष उपलब्ध आहेत का हे तपासणे:** ग्रंथालयात दाखल झालेली पुस्तके हि त्या पुस्तकांच्या बिलांनुसार दाखल नोंदवहीत नोंदविली जातात. प्रत्येक पुस्तकास विशिष्ट दाखल अंक देण्यात येतो. हि सर्व पुस्तके दाखल अंकानुसार, विषयानुसार, प्रकाशकांनुसार ग्रंथालयातील कपाटांमध्ये रचण्यात येतात. हि सर्व पुस्तके प्रत्यक्ष उपलब्ध आहेत कि नाही हे साठा पडतळणी करून लक्षात येते.

२. **नोंदींची शुद्धता राखणे:** दाखल नोंदवहीत साठा पडताळणीची टिपण्णी टाकताना तेथील नोंदीची माहिती अचूक आहे हे तपासणे व मूळ नोंदीची शुद्धता राखणे गरजेचे आहे.

३. **हरवलेली किंवा नष्ट झालेली पुस्तके शोधणे:** ग्रंथालयांत ग्रंथ देवाण करण्यासाठी ग्रंथ साठ्याचा वापर पुरेपूर व्हावा या उद्देशाने खुला प्रवेश देण्यात येतो. त्यास ओपन ॲक्सेस सिस्टीम किंवा खुली प्रवेश प्रणाली असे संभोदतात. यामुळे विद्यार्थ्यांकडून एखाद्या पुस्तकाची जागा बदलण्याचा संभव असतो. अश्या परीस्थित पुस्तके हरवणे अशी परिस्थिती तयार होते. साठा पडताळणीमुळे अशी हरवलेली पुस्तके शोधता येणे शक्य होते. जी पुस्तके तपासात मिळाली नसल्यास त्यांची यादी बनवून ती अहवालात नमूद करावीत.

४. **अहवाल तयार करणे व लेखापरीक्षण सुलभ करणे:** साठा पडताळणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्व माहिती व्यवस्थित नोंदवून अहवाल तयार करणे हे महत्त्वाचे पाऊल आहे. या



अहवालाचा उपयोग ग्रंथालय व्यवस्थापन, लेखापरीक्षण आणि भविष्यातील धोरणनिर्मितीसाठी केला जातो. साठा पडताळणीदरम्यान मिळालेल्या सर्व निष्कर्षांचा तपशीलवार समावेश करणे आवश्यक असते. अहवालात हरवलेली पुस्तके, पुनरावृत्ती झालेली पुस्तके, फाटलेली व जीर्ण पुस्तके, अनुपलब्ध पुस्तकांची यादी यांचा समावेश असतो. प्रत्येक पुस्तकाची स्थिती, शेल्फ क्रमांक, विभागानुसार वर्गीकरण आणि उपलब्धता नोंदींसह सादर केली जाते. अहवाल तयार झाल्यानंतर लेखापरीक्षणासाठी आवश्यक सर्व माहिती एका ठिकाणी असते, ज्यामुळे लेखापरीक्षकांना ग्रंथालयाच्या साठ्याची पडताळणी करणे सोपे होते. अहवालात नोंदींची स्पष्टता, सांख्यिकीय डेटा आणि शिफारसी असतात, जे पुढील व्यवस्थापन निर्णय घेण्यासाठी उपयुक्त ठरतात.

**साठा पडताळणीची वेळ व वारंवारिता**

१. लहान ग्रंथालयांसाठी : दरवर्षी शैक्षणिक वर्षाच्या शेवटी एकदा साठा पडताळणी करावी.

२. मोठ्या ग्रंथालयांसाठी : तीन वर्षांतून एकदा विभागनिहाय किंवा विषयवार साठा पडताळणी करावी.

३. नियामक संस्था जसे एआयसीटीई, डीटीई, एनबीए, युजीसी च्या नियमांनुसार ही प्रक्रिया अनिवार्य असते.

शेर-ए-कश्मीर युनिव्हर्सिटी ऑफ ॲग्रिकल्चर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, काश्मीर येथील ग्रंथालय प्रणालीतील पुस्तकांच्या साठा पडताळणीची स्थिती आणि कार्यपद्धतीचा सखोल अभ्यास

करण्यात आला आहे.या संशोधनामध्ये (Jan, 2018) ग्रंथालयातील साठा पडताळणी ही केवळ तांत्रिक प्रक्रिया नसून ती ज्ञानसंपत्तीचे रक्षण करणारी एक जबाबदारी असल्याचे स्पष्ट केले आहे. लेखकांनी साठा पडताळणीची गरज, पद्धती आणि तिचे शैक्षणिक संस्थांवरील परिणाम अतिशय सूक्ष्मतेने मांडले आहेत. या प्रक्रियेमुळे केवळ हरवलेली पुस्तकेच सापडत नाहीत, तर ग्रंथालय व्यवस्थापन अधिक कार्यक्षम बनते. अखेरीस, साठा पडताळणी ही ग्रंथालयाच्या पारदर्शकतेचा आणि प्रगतीचा पाया ठरते; जणू ज्ञानसागरात स्वच्छतेचा दीप पेटवणारी एक प्रेरणादायी प्रक्रिया.[3]

**साठा पडताळणीची पद्धत**

**अ. तयारी टप्पा:** साठा पडताळणीची प्रक्रिया यशस्वी होण्यासाठी योग्य तयारी करणे अत्यंत महत्त्वाचे असते. तयारी टप्प्यात खालील गोष्टींचा समावेश केला जातो.

**१. नोंदी तयार ठेवणे:** सर्व आवश्यक नोंदी आधीपासून व्यवस्थित ठेवणे गरजेचे असते. यात दाखलनोंद वही (नवीन पुस्तकांची नोंद), पुस्तक देवाणघेवाण वही (पुस्तकांचा वापर व परतावा नोंद), पुस्तकांची अचूक जागेची नोंद वही (शेल्फवर उपलब्ध पुस्तके) आणि बारकोड नोंदी यांचा समावेश होतो. या नोंदींचा वापर करून पडताळणी दरम्यान कोणती पुस्तके उपलब्ध आहेत किंवा अनुपस्थित आहेत, हे सहज तपासता येते.

**२. शेल्फ व्यवस्थापन:** ग्रंथालयातील पुस्तके विषयानुसार व वर्ग क्रमांकानुसार व्यवस्थित लावणे आवश्यक असते. योग्य शेल्फ



व्यवस्थापनामुळे पुस्तके पटकन शोधता येतात आणि पडताळणीची प्रक्रिया जलद व अचूक होते.

**३. टीम नियुक्ती :** साठा पडताळणीसाठी योग्य टीम तयार करणे महत्त्वाचे असते. यात ग्रंथपाल, सहाय्यक कर्मचारी आणि विभागनिहाय शिक्षक यांचा समावेश असतो. टीम सदस्यांचे कार्य निश्चित करणे आवश्यक आहे. ही सदस्य पुस्तके पडताळतील, काही नोंदी तपासतील, तर काही अनुपलब्ध किंवा जीर्ण पुस्तके नोंदवतील. या तयारी टप्प्यामुळे पडताळणी प्रक्रिया सुरळीत, वेगवान आणि अचूक होऊन ग्रंथालय व्यवस्थापनासाठी उपयुक्त अहवाल तयार करता येतो.

**ब. प्रत्यक्ष पडताळणी** : साठा पडताळणीच्या प्रक्रियेत प्रत्यक्ष पडताळणी ही महत्त्वाची पायरी आहे, ज्यामध्ये ग्रंथालयातील प्रत्येक पुस्तकाची उपस्थिती आणि स्थिती तपासली जाते.

**१. हाताने पडताळणी:** प्रत्येक पुस्तक प्रत्यक्ष हाताळून त्याचा दाखल अंक आणि नोंदीशी जुळणी करणे.

**२. संगणकाधारित ग्रंथालयात बारकोड स्कॅन:** बारकोडच्या माध्यमातून पुस्तक स्कॅन करून त्याची उपस्थिती तातडीने नोंदवणे.

**३. इलेक्ट्रॉनिक/ आरएफआयडी पद्धत:**मोठ्या ग्रंथालयांसाठी ही आधुनिक पद्धत अचूकता वाढवते आणि पडताळणीची गती सुधारते.

४. **अनुपलब्ध पुस्तकांची यादी तयार करणे:** पडताळणी दरम्यान सापडलेली अनुपलब्ध पुस्तके नोंदवून त्यांची यादी तयार करणे, ज्यामुळे शोध, पुनःखरेदी किंवा दुरुस्तीची शिफारस करता येते.

क. **अहवाल तयार करणे**: साठा पडताळणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्व निष्कर्ष एकत्र करून सविस्तर अहवाल तयार केला जातो. हा अहवाल ग्रंथालय व्यवस्थापनासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. त्यात खालील बाबींचा समावेश केला जातो.

१. **हरवलेली पुस्तके:** पडताळणीदरम्यान जर कोणती पुस्तके नोंदवहीत असली तरी प्रत्यक्ष सापडली नाहीत, तर ती हरवलेली म्हणून नोंदवली जातात. अशा पुस्तकांची यादी तयार करून त्यांच्या शोधासाठी, पुनःखरेदीसाठी किंवा रद्द करण्यासाठी संबंधित शिफारसी केल्या जातात.

२. **पुनरावृत्ती झालेली पुस्तके:** काही वेळा एकाच पुस्तकाच्या अनेक प्रती अनावश्यकपणे उपलब्ध असतात. अशा पुस्तकांची यादी तयार करून, भविष्यातील खरेदीत पुनरावृत्ती टाळण्यासाठी आणि साठ्याचे संतुलन राखण्यासाठी सूचना दिल्या जातात.

३. **फाटलेली, जीर्ण झालेली किंवा अनुपयुक्त पुस्तके :** दीर्घकाळ वापरामुळे काही पुस्तके फाटलेली, पानं सुटलेली किंवा वाचण्यायोग्य नसलेली असतात. अशा पुस्तकांची तपशीलवार नोंद करून त्यांची दुरुस्ती, पुनर्बांधणी किंवा विलोपनाची प्रक्रिया सुचवली जाते.



**वरील सर्व तपशीलांसह सादर केलेला अंतिम अहवाल:** सर्व माहिती एकत्र करून अंतिम अहवाल तयार केला जातो, ज्यात हरवलेल्या, पुनरावृत्त व जीर्ण पुस्तकांची यादी, सांख्यिकीय माहिती, कारणमीमांसा आणि भविष्यासाठी शिफारसी असतात. हा अहवाल संस्थेच्या लेखापरीक्षणासाठी आणि ग्रंथालय व्यवस्थापनाच्या कार्यक्षमतेसाठी आधारभूत दस्तऐवज ठरतो.

ग्रंथालयातील साठा पडताळणी ही केवळ गणनेची प्रक्रिया नसून, ती ज्ञानसंपदेच्या जपणुकीची एक सुंदर कहाणी आहे. या अभ्यासातून डोंगरे सरांनी दाखवून दिले की, प्रत्येक पुस्तक हे संस्थेच्या ज्ञानविश्वासाचा एक जिवंत श्वास आहे. काळाच्या ओघात हरवलेली, विस्मृतीत गेलेली पुस्तके शोधण्याची हि एक भावनिक यात्रा ठरते. (DONGRE, २०२५) यांच्या मतानुसार साठा पडताळणीमुळे ग्रंथालय केवळ व्यवस्थित होत नाही, तर त्यातील ज्ञानाला नवजीवन मिळते अशा प्रकारे ही प्रक्रिया ग्रंथालयाच्या आत्म्याला पुनर्जीवित करणारी ठरते.[१]

ड. **पुढील कारवाई :** साठा पडताळणी पूर्ण झाल्यानंतर निष्कर्षानुसार योग्य पुढील कारवाई करणे अत्यंत महत्त्वाचे असते. या टप्प्यात खालील बाबींचा समावेश होतो:

१. **हरवलेल्या पुस्तकांचा शोध घेणे**: पडताळणी दरम्यान सापडलेली हरवलेली पुस्तके शोधून काढणे आवश्यक असते. यासाठी ग्रंथालयातील इतर नोंदी तपासणे, मागील वाचनदारांची माहिती घेणे किंवा शोध मोहिम राबवणे यासारख्या पद्धती वापरल्या जातात. शोध लागलेली पुस्तके परत मिळवली तर ती पुन्हा साठ्यात समाविष्ट केली जातात.

२. **जुनी, अप्रासंगिक पुस्तके विडींग आउट पॉलिसी नुसार कमी करणे** : काही पुस्तके कालबाह्य, अप्रासंगिक किंवा वापरात नसलेली असतात. अशा पुस्तकांची ग्रंथालयातील जागा रिकामी करण्यासाठी विडींग आउट पॉलिसी नुसार त्यांचा संकलन कमी करणे किंवा दान/विक्री/विलोपन करणे आवश्यक असते. हे ग्रंथालयाचे व्यवस्थापन अधिक कार्यक्षम आणि सुव्यवस्थित ठेवण्यास मदत करते.

३. **अहवालावर स्वाक्षऱ्या घेणे :** अंतिम साठा पडताळणी अहवाला वर ग्रंथपाल, समिती प्रमुख आणि प्राचार्य यांच्या स्वाक्षऱ्या घेणे अनिवार्य असते. हे अहवालाचे अधिकृत दस्तऐवज म्हणून मान्यता मिळवण्यासाठी आवश्यक आहे आणि पुढील लेखापरीक्षण व व्यवस्थापनासाठी आधारभूत ठरते. या प्रक्रियेमुळे ग्रंथालयाचे साठा व्यवस्थापन अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि कार्यक्षम बनते. ग्रंथपाल अरुण भीमराव हमबर्डे (Hambarde, 2023) यांनी 'नवमाध्यमांद्वारे साठा पडताळणी' या विषयावर सखोल चिंतन केले आहे. एकेकाळी धुळीने भरलेल्या रजिस्टरमधून केली जाणारी साठा पडताळणी, आज बारकोड, आरएफआयडी आणि डिजिटल साधनांच्या मदतीने किती सुलभ झाली आहे हे या लेखातून जाणवते. नवमाध्यमांचा वापर केवळ वेळ वाचवतोच नाही तर ग्रंथालयाच्या कार्यक्षमतेतही नवा प्राण फुंकतो. ही बदलाची गोष्ट म्हणजेच पारंपरिकतेतून तंत्रज्ञानाकडे जाणाऱ्या ग्रंथालय व्यवस्थापनाच्या प्रवासाची प्रेरणादायी कथा आहे.



- **साठा पडताळणीची अचूकता राखण्यासाठी सूचना:**

ग्रंथालयातील पुस्तकांचा साठा अचूक ठेवण्यासाठी काही महत्त्वाच्या सूचना आहेत. या सूचना पाळल्यास साठा पडताळणी अधिक कार्यक्षम आणि विश्वासार्ह होते.

१. **स्वतंत्र पडताळणी समिती नियुक्त करणे:** साठा पडताळणी साठी स्वतंत्र समिती तयार करणे आवश्यक आहे. यात ग्रंथपालासह विभागनिहाय शिक्षक व सहाय्यक कर्मचारी असावेत. स्वतंत्र समिती असल्यास पडताळणीमध्ये कोणत्याही प्रकारचा पक्षपात किंवा त्रुटी होण्याची शक्यता कमी होते.

२. **बारकोड / आरएफआयडी प्रणाली वापरणे :** आधुनिक ग्रंथालयात पुस्तके स्कॅन करण्यासाठी बारकोड किंवा आरएफआयडी रेडीओ फ्रि क्वेन्सि आयडेंटीफिकेशन प्रणाली वापरणे आवश्यक आहे. या प्रणालीमुळे साठा पडताळणी जलद, अचूक आणि त्रुटीरहित होते.

३. **नोंदी अद्ययावत ठेवणे:** सर्व नोंदी जसे की दाखलनोंद वही, देवाणघेवाण वही, पुस्तकांच्या अचूक जागांची यादी इत्यादी नेहमी अद्ययावत ठेवणे महत्त्वाचे आहे. अद्ययावत नोंदी पडताळणी दरम्यान कोणती पुस्तके उपलब्ध आहेत, कोणती अनुपस्थित आहेत हे सहज समजतात.

४. **हरवलेल्या पुस्तकांवर कार्यवाही करणे:** पडताळणी दरम्यान सापडलेली हरवलेली पुस्तके तातडीने शोधून काढणे. जर पुस्तक परत मिळाले नाही तर त्यानुसार पुनः खरेदी, दुरुस्ती किंवा विलोपनाची कार्यवाही करणे.

५. **अंतिम प्रमाणपत्र तयार करणे:** सर्व पडताळणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अंतिम प्रमाणपत्र तयार करणे आवश्यक आहे. हे प्रमाणपत्र ग्रंथपाल, समिती प्रमुख आणि प्राचार्य यांच्या स्वाक्षऱ्यांसह अधिकृत दस्तऐवज म्हणून ठेवले जाते. या सूचनांचे पालन केल्यास ग्रंथालयाचा साठा अचूक, सुरक्षित आणि सुव्यवस्थित राहतो, तसेच पुढील लेखापरीक्षण व व्यवस्थापनासाठी आधारभूत ठरतो.

**निष्कर्ष:**

ग्रंथालय साठा पडताळणी ही केवळ पुस्तके मोजण्याची प्रक्रिया नसून, ती शिस्त, जबाबदारी, पारदर्शकता आणि व्यवस्थापनाची ओळख आहे. नियमित व काटेकोर पडताळणी केल्याने वाचनसामग्रीची सुरक्षितता, विश्वासार्हता आणि ग्रंथालयावरील विद्यार्थ्यांचा विश्वास टिकून राहतो. परिणामी संस्थेचे शैक्षणिक वातावरण अधिक सुदृढ आणि ज्ञानसमृद्ध बनते.

**संदर्भ:**


Dongre, S. (2025). Stock Verification In Libraries: An Extensive Study. Anthology The Research .

Hambarde, A. B. (2023). Stock verification via new media. IP Indian Journal of Library Science and Information Technology., 63-37.

Jan, A. (2018). Stock Verification of Books SKUAST-K Library System: A Survey. International Journal of Current Advanced Research, 12927-12929.




# साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे यांचे वाचन : एक अभ्यास


**सुरेखा खरे, सहायक ग्रंथपाल**

नेस वाडिया वाणिज्य महाविद्यालय

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

व्ही. के. जोग पथ, पुणे -४११००१

kharesurekha@gmail.com

---

**प्रा. डॉ. वंदना रवींद्र शेलार, ग्रंथपाल**

गरवारे कॉलेज ऑफ आर्ट्स आणि सायन्स ,

कर्वे रोड , पुणे – ४११००४

vandanashelar@gmail.com


---

**सारांश**


महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्राच्या जडणघडणी मध्ये अनेक समाजसुधारकांचा मोलाचा वाटा आहे तसेच महाराष्ट्रातील समाजसुधारकांच्या जडणघडणीमध्ये वाचनाचे मोलाचे योगदान आपल्याला दिसते. वाचनाने व्यक्तिमत्व घडते. लोकहितवादी पासून अण्णाभाऊ साठे यांच्यापर्यंत जर कालानुक्रमे बघितले तर या सर्व समाजसुधाराकांच्या वैचारिक जडणघडणीवर आपल्याला पुस्तकाचा प्रभाव पडलेला दिसतो. लोकशाहीर, कलावंत, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी मराठी साहित्याला समृद्ध करणारी साहित्य निर्मिती केली आहे . अण्णाभाऊ साठे यांनी त्यांच्या साहित्यातून समाजातील गरीब, वंचित आणि शोषितांचा आवाज उठवला तसेच

अन्याय, विषमता आणि दारिद्य यावरही प्रकाश टाकला. हक्कांसाठी लढण्याची प्रेरणा अण्णाभाऊ यांच्या साहित्याने दिली आहे. एकूणच साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीतून इथल्या दलित, उपेक्षितांच्या व्यथा सर्वांच्या पुढे मांडल्या आहेत. अण्णाभाऊ साठे हे एक समाज शिक्षक होते. म्हणून अण्णाभाऊ साठे यांनी केलेल्या वाचनाचा त्यांच्या वैचारिक जडणघडणीवर आणि कार्यावर झालेला परिणाम यांचा थोडक्यात आढावा या लेखामध्ये घेण्यात आला आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या वाचन सवयी जाणून घेण्याकरिता विविध संदर्भग्रंथ, तसेच विविध संकेत स्थळावरील माहितीचा वापर या लेखामध्ये मध्ये करण्यात आला आहे.

**बीज शब्द :** अण्णाभाऊ साठे,वाचन,साहित्य, मार्क्सवाद, आंबेडकरवाद

**प्रस्तावना**

जागतिक आरोग्य संघटना, युनिसेफ, युनेस्को या संस्थांनी दहा जीवन कौशल्य सांगितली आहेत. समस्या निवारण्याचे कौशल्य, चिकित्सकपणे विचार करण्याचे कौशल्य, परिणामकारक संप्रेषणाचे कौशल्य, निर्णय घेण्याचे कौशल्य, सृजनशील विचार करण्याचे कौशल्य, परस्पर संबंध निर्माण करण्याचे आणि ते टिकविण्याचे कौशल्य, स्वतःबद्दलची जाणीव असण्याचे कौशल्य, सहानुभूतीने म्हणजेच इतरांच्या भावना जाणून घेण्याचे/वागण्याचे कौशल्य, ताणतणावावर मात करण्याचे कौशल्य आणि भावनांवर नियंत्रण ठेवण्याचे कौशल्य. माणसांच्या जीवनातील आव्हानांचा समर्थपणे सामना करत यशस्वीपणे जीवन जगण्यासाठी हि कौशल्य अतिशय महत्वाची आहेत आणि ती साध्य करण्यासाठी वाचन हे मुलभूत कौशल्य आहे.



जीवनात अनेकदा पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे मिळविण्यासाठी, विचारला चालना देण्यासाठी, वाचन करणे गरजेचे आहे. आपले वर्तन, आपला विचार, आपले मत, आपला दृष्टीकोन, आणि आपला व्यवहार इत्यादीवर आपल्या वाचनाचा प्रभाव पडतो. वाचन हि एक व्यक्तिमत्व घडवणारी प्रक्रिया आहे . कार्लाईल म्हणतात, आतापर्यत मनुष्य जातीने जे काही केले आहे, ते सर्व पुस्तकामुळे आहे आणि ते पुस्तकातही आहे. या लेखात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी वाचलेली पुस्तके, त्यांच्या प्रेरणा आणि त्यांनी निर्माण केलेले साहित्य याचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर कोणत्या पुस्तकांचा प्रभाव पडला आहे हे पाहणे.
२. अण्णाभाऊ साठे यांच्या वाचन सवयींचा अभ्यास करणे .
३. अण्णाभाऊ साठे यांनी केलेल्या कार्याची थोडक्यात ओळख करून देणे.

**संशोधन पद्धती**

हा अभ्यास दुय्यम सामग्रीवर आधारित असून विविध संदर्भग्रंथ, तसेच विविध संकेत स्थळावरील माहितीचा वापर या मध्ये करण्यात आला आहे.

अण्णाभाऊ साठे यांचा स्वयंशिक्षित वाचक म्हणून प्रवास खूप प्रेरणादायी आहे. सुरुवातीपासूनच वाचनाच्या सवयी त्यांनी स्वतःला कशा लावल्या तसेच त्यांनी काय वाचले आणि त्यांच्या जीवनावरचा पुस्तकांचा प्रभाव बघण्या आधी त्यांची शैक्षणिक पार्श्वभूमी काय होती हे

बघणे गरजेचे आहे.अण्णाभाऊ साठे यांचे मुळ नाव तुकाराम भाऊराव साठे, ते केवळ दीड दिवस शाळेत गेले.

एकूणच समाजाच्या विकासासाठी औपचारिक शिक्षणाला महत्व असले तरी अण्णाभाऊच्या बाबतीत समाज जीवनातून मिळालेले शिक्षणच त्यांच्यासाठी अधिक मोलाचे ठरले. मुंबई मध्ये रहात असताना त्यांना घरगडी, हॉटेल बॉय, हमाल, डोअर कीपर, खाण कामगार, सिनेमाची पोस्टर लावणे, मुलांना खेळवणे, इत्यादी अनेक प्रकराची कामे करावी लागली आणि हि कामे करीत असतानाचा मित्राच्या मदतीने ते साक्षर झाले, आणि त्यानंतर त्यांचा वाचन प्रवास सुरु झाला. १९४५ च्या दरम्यान लोकयुद्ध साप्ताहिकात वार्ताहराचे काम करीत असताना त्यांनी अकलेची गोष्ट, खापऱ्या चोर, माझी मुंबई अशी गाजलेली लोकनाट्ये लिहिली. या काळातच संत साहित्यासह अनेक प्रतिभावंतांच्या अभिजात कलाकृती त्यांनी वाचून काढल्या होत्या. त्यांनी केलेल्या वाचनाचा त्यांच्या वैचारिक जडणघडणी मध्ये प्रभाव जाणवतो. वाचनाबद्दल पाउलो फ्रेअरी म्हणतात, ' Reading the world always precedes reading the word, and reading the word implies continually reading the world' "जगाचे वाचन हे नेहमीच शब्द वाचण्यापूर्वी असते आणि शब्द वाचणे म्हणजे सतत जगाचे वाचन करणे होय" .[२]

शब्द वाचण्यापूर्वी माणूस जग वाचायला शिकतो. आपण जर अण्णाभाऊ यांचा जीवन संघर्ष बघितला तर असे दिसते कि पुस्तके वाचण्याचा अगोदर अण्णाभाऊ साठे यांनी समाजाचे वाचन केले होते. स्वयंशिक्षित अण्णाभाऊ साठे यांचा वाचन व्यासंग मोठा आणि सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.



**साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा स्वयं शिक्षित वाचकाचा प्रेरणादायी प्रवास**

| अ. क्रं | वर्णन | अण्णाभाऊ साठे यांच्या वाचन सवयी |
|---|---|---|
| १. | अक्षर ओळख | साक्षरतेचा अभाव, मुंबईतील चित्रपटाच्या आणि दुकानाच्या पाट्यांवरील अक्षरे जुळवीत ते साक्षर झाले. पाट्या वाचणे, सिनेमे बघणे (ऐकण्याच्या माध्यमातून शिकणे), वाचन आणि लेखन स्वतः शिकले. अनेकदा पुस्तके उधार घेवून ते वाचन करीत असत. तसेच वर्तमानपत्रे जिथे दिसतील तेथे ते वाचत. |
| २ | वाचन करणे | महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्याचे वाचन. मार्क्सवादी तसेच फ्योदोर दोस्तोव्हस्की, मॅक्सिम गॉर्की यांचे साहित्य, त्याच बरोबर अनेक कथा, कादंबऱ्या यांचे वाचन त्यांनी केले. |
| ३ | ग्रंथालय निर्मिती | स्वत:च्या घरात एक लहान ग्रंथालय त्यांनी निर्माण केले होते. |
| ४ | पुस्तक परीक्षण | अण्णाभाऊ साठे यांनी अनेक पुस्तकांची परीक्षणे युगांतर या साप्ताहिकामध्ये केलेली आहेत. |
| ५ | समाज वाचन | पुस्तकांच्या वाचनाबरोबर समाजाचेही बारकाईने निरीक्षण त्यांनी केले होते. त्यांच्या कथा आणि कादंबऱ्या मधून आपल्याला ते दिसते. साहित्याला त्यांनी सामाजिक चळवळीशी जोडले आहे. |
| ६ | वाचनाचा प्रभाव | वाचनाने त्यांच्या साहित्यिक कारकिर्दीला चालना मिळाली . वाचनाने समृद्ध लेखक होण्यास मदत झाली. |

तक्ता न. १

अण्णाभाऊ साठे मुंबईमध्ये आल्यावर अण्णाभाऊंच्या मनाला अनेक प्रश्न पडू लागले आणि या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी त्यांची धडपड सुरु झाली. त्यांच्या पाहुण्यातील एका मित्राच्या सहकार्याने साक्षर झाल्यानंतर त्यांची वाचनाची आवड वाढत गेली आणि पुस्तकांमधून ते त्यांच्या प्रश्नांची उत्तरे शोधू लागले. त्यासाठी त्यांनी आपल्या राहत असलेल्या लहान खोलीत एक छोटे ग्रंथालय निर्माण केले. संत नामदेव, संतज्ञानेश्वर, संत तुकाराम, महात्मा फुले, महर्षी शिंदे, हरिवंशराय बच्चन, सुर्यकांत त्रिपाठी, खलील जिब्रान, मॅक्सिम गॉर्की, लिओ टॉल्स्टॉय, लेनिन चरित्र, श्री.म.माटे, हरिभाऊ आपटे, रशियन क्रांतीचा इतिहास, कामगार वाङमय मंडळाने मराठीत प्रकाशित केलेला मार्क्स-एंगल्सचा "कम्युनिस्ट जाहिरनामा" कामगार चळवळीचे "मुंबई कामगार " साप्ताहिक,डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वी.स.खांडेकर, ना.सी.फडके, इ. लेखकांचे साहित्य त्यांनी वाचले होते.[३]

मराठी साहित्यात कलेसाठी कला कि जीवनासाठी कला असा वाद निर्माण झाला होता, खांडेकर - फडके वाद असेही याला म्हणतात. कलेच्या उद्देशाबद्दल हे दोन भिन्न दृष्टीकोन आहेत. कलेसाठी कला म्हणजे ही संकल्पना 19 व्या शतकात फ्रान्समध्ये उदयास आली, आणि 'थियोफाइल गौटियर' आणि 'चार्ल्स बाउडेलेअर' यांसारख्या कलाकारांशी जोडलेली आहे. कलेसाठी कला म्हणजे स्वताच्या आनंदासाठी कला, त्याला सामाजिक आशय नसतो तर जीवनासाठी कला म्हणजे माणसाला केंद्रबिंदू ठेवून, मानवी भावनां, समस्यां आणि त्यांचे प्रश्न यावर प्रकाश टाकणे .



खांडेकर यांनी जीवनासाठी कला, तर ना.सी . फडके यांनी कलेसाठी कला या सिद्धांताचा पुरस्कार केला. अण्णाभाऊ साठे हे जीवनासाठी कला या प्रकारात मोडतात त्यांच्या साहित्यातून इथल्या वंचित, उपेक्षित आणि दलित समाजाचे दुख प्रतिबिंबित झाले आहे. त्यांच्या मांडणीतून त्यांची समाजशिक्षक अशी ओळख दिसते. अण्णाभाऊ म्हणतात,' **कल्पनेच्या भराऱ्या मला मारता येत नाही, मी जे जगलो, जे अनुभवल ते मी लिहितो'**. ***'पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर*** **तरलेली नसून दलित व कामगार लोकांच्या तळहातावर तरलेली आहे'** हे आपल्या साहित्यातून परखड पणे मांडणारे अण्णाभाऊ हे विज्ञानवादी होते. त्यांनी त्यांच्या साहित्यातून काल्पनिक कथाऐवजी वास्तववादी कथावर अधिक भर दिलेला दिसतो.

अण्णा भाऊंच्या लिखाणामागे महात्मा फुले यांच्या विचाराचा प्रभाव तसेच मार्क्सवाद आणि आंबेडकरवादाच्या प्रेरणा दिसतात. अण्णाभाऊ यांनी वैचारिक आणि सामाजिक बांधिलकी जपत अनेक पोवाडे लावणी, गीते, कथा कादंबऱ्या, प्रवासवर्णन, नाटक, लोकनाट्य, असे विविध साहित्य लिहिले.

१९४७ रोजी 'महाराष्ट्राची परंपरा' या पोवाड्यात अण्णाभाऊ साठे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कर्तुत्वाचे वर्णन केले आहे,

**ते वीर मावळे गडी धन्य जाहले। स्वातंत्र्य संगरी शस्त्र घेतले ।**
**आणि प्रतिकाराचे ।कुंड पेटवून दिले ।**
**गीरीकंदाला उठविले ।गड कोटांना हलविले ।**
**शिवराय त्यात रणधीर ।त्यांनी घनघोर ।**
**कपारीतून शिंग फुंकिले ॥ जी ॥**

महात्मा फुले यांच्या कार्याचा उल्लेख करताना अण्णाभाऊ साठे म्हणतात,

**“महात्मा फुले लाभले महाराष्ट्राला**
**अन्याय निवारून न्याय द्याया दलिताला” ॥** (४)

तसेच पोवाड्यात त्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत जनाबाई, संत रामदास, अशी अनेक संतांची महती गायली आहे. यावरून त्यांनी संत साहित्य वाचल्याचे आपल्याला दिसते.

अण्णाभाऊ यांचे जन्म वर्ष १९२०, हे वर्ष खूप महत्वाचे वाटते कारण याच वर्षी अण्णाभाऊंच्या जन्मापूर्वी सहा महिने अगोदर, ३१ जानेवारी १९२० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मूकनायक हे मुखपत्र सुरु केले होते इथल्या व्यवस्थेने दाबून टाकलेल्या अस्पृश्यांचा आवाज तसेच निसर्गाने माणसाला दिलेल्या हक्काची जाणीव मुकनायक हे पत्र करून देत असतानाच्या काळात अण्णाभाऊ यांचा जन्म झाला. आणि अण्णाभाऊनी आपल्या लेखणीतून इथल्या दलित, उपेक्षितांच्या व्यथा सर्वांच्या पुढे मांडल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल असलेली निष्ठा त्यांच्या पुढील गीतेमधून आपल्याला समजते. ६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब यांचे निधन झाले तेंव्हा अंधेरी मध्ये बाबासाहेबांना या गीतेमधून त्यांनी श्रद्धांजली वाहिली होती.

अण्णाभाऊ या प्रसिद्ध गीतात म्हणतात,

**जग बदल घालूनी घाव । सांगून गेले मला भीमराव ॥**
**गुलामगिरीच्या या चिखलात । रुतून बसला का ऐरावत ॥**
**अंग झाडुनी निघ बाहेरी । घे बिनिवरती घाव ॥**
**गेले सांगून मला भीमराव ॥**



या गीतातून इथल्या समाज व्यवस्थेच्या, वर्णव्यवस्थेच्या, गुलामगिरीच्या विरोधात बंड केले पाहिजे असे अण्णभाऊ सांगतात.

**साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या वैचारिक जडणघडणीवर प्रभाव टाकणारे साहित्य**

| अ.क्र. | अण्णाभाऊसाठे यांनी वाचलेली पुस्तके | पुस्तकांचा प्रभाव |
|---|---|---|
| १ | महात्मा फुले यांनी लिहिलेली पुस्तके | जातीविरोधी, अन्यायाच्या विरोधात लढा |
| २ | डॉ. बाबासाहेबांचे लेखन आणि भाषणे | माणूस म्हणून जगण्याचा हक्काची ओळख |
| ३ | कम्युनिस्ट जाहीरनामा, दास कॅपिटल- | अन्याय, शोषण आणि पिळवणूकीला साहित्यातून विरोध केला . वर्ग संघर्ष, शोषितांबद्दल प्रेरणादायी लेखन, कामगार चळवळीला प्रेरणा. |
| ४ | राज्य आणि क्रांती- | कामगार चळवळी द्वारे समाजात बदल घडवून आणणे. |
| ५ | मॅक्सिम गॉर्की यांचे साहित्य | लेखन दृष्टी बदलली |

तक्ता न. २

महात्मा फुले यांनी ‘ब्राह्मणाचे कसब’ हा ग्रंथ कुणबी, माळी, महार, मांग समाजाला अर्पण केंला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी, ‘अस्पृश्य मुळचे कोण?’ हा ग्रंथ महात्मा फुले यांना अर्पण केला आणि अण्णाभाऊ यांनी ‘फकीरा’ कादंबरी बाबासाहेबांना अर्पण केली आहे. यामधून आपल्याला असे दिसते कि महात्मा फुले यांनी शेतकरी आणि अस्पृश्य व बहुजन समाजांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी

विचारांची कास धरली तर डॉ. बाबासाहेबांनी महात्मा फुले यांना गुरु मानून अखेरपर्यंत समतेचा लढा दिला. महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर अण्णाभाऊची निष्ठा होती.

गुलामगिरी, सार्वजनिक सत्यधर्म,शेतकऱ्याचा आसूड, ब्राह्मणांचे कसब, अशा अनेक पुस्तकातून समाजातील जातीय विषमतेवर आणि ब्राह्मणी वर्चस्वावर जोरदार टीका केली तसेच धार्मिक आणि सामाजिक रूढी परंपरा यांना विरोध केला आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांनी "गुलामगिरी" हे पुस्तक १८७३ साली लिहीले असून या पुस्तकात त्यांनी तत्कालीन समाजातील जातीय विषमतेवर आणि ब्राह्मणी वर्चस्वावर जोरदार टीका केली तसेच धार्मिक आणि सामाजिक रूढी परंपरा यांना विरोध केला आहे.

माणसांना अज्ञानात ठेवून त्यांना गुलाम बनवून त्यांच्यावर अन्याय करणे, त्यांना त्यांच्या मुलभूत हक्कापासून वंचित ठेवणे, ही गुलामगिरी आहे असे ते म्हणतात. त्यांनी गुलामगिरी, अस्पृश्यता आणि शिक्षणाचे महत्व यांसारख्या विषयांवर प्रकाश टाकला आहे. तर १८८३ साली शेतकऱ्याच्या आसूड या पुस्तकातून शेतकऱ्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. सार्वजनिक सत्यधर्म या पुस्तकामध्ये त्यांनी सृष्टीचा निर्माता एक आहे आपण सर्व त्याची लेकरे असून आपण सर्व बांधव आहोत म्हणूनच बंधुत्वाच्या नात्याने सर्वांनी आचरण केले पाहिजे. सर्वांचा निर्मिक एक असल्याने प्रत्येक व्यक्तीचे मानवी अधिकार हे सारखेच आहेत. सर्वांसाठी समान न्याय असला पाहिजे. तसेच इतरांच्या अधिकारांना बाधा येणार नाही असे सत्य वर्तन केले पाहिजे असे महात्मा ज्योतिबा फुले म्हणतात.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकजागृतीचे साधन म्हणून बहिष्कृत भारत, आणि मूकनायक, जनता,समता, प्रबुद्ध भारत अशी वृत्तपत्रे काढली. या पत्रामधून बहिष्कृत समाजाच्या प्रश्नांची चर्चा केली. अस्पृश्य समाजाला योग्य मार्ग दाखविण्यासाठी तसेच त्यांच्यामध्ये स्वत्वाची भावना निर्माण करण्यासाठी, त्यांचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी, त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचारा विरुद्ध संघर्ष करण्यासाठी त्यांना तयार करण्याकरिता तसेच डॉ. बाबासाहेबांनी आणि त्यांच्या अनुयायांनी या अन्याय, अत्याचारा विरुद्ध केलेल्या चळवळी आणि आंदोलने समाजापर्यंत पोहचविण्यासाठी, आणि अस्पृशाना सामाजिक हक्काची जाणीव करून देण्यासाठी वरील वृत्तपात्रांची निर्मिती बाबासाहेबांनी केली होती.

तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ग्रंथसंपदा खूप मोठी आहे. प्रॉब्लेम्स ऑफ रुपी, ॲनिहिलेशन ऑफ कास्ट, शूद्र पूर्वी कोण होते? वेटिंग फॉर अ व्हिसा, बुद्ध आणि त्यांचा धम्म. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक, राजकीय, आणि आर्थिक अशा अनेक विषयावर लेखन केले आहे. त्यांच्या लेखनामधून सामाजिक न्यायासाठी आणि समतेसाठी चळवळींना प्रेरणा मिळाली आहे. या व्यतिरिक्त, त्यांनी अनेक शोधनिबंध, लेख, आणि परिक्षणे लिहिली आहेत, तसेच विविध विषयांवरची भाषणे दिली आहेत.

महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ग्रंथामधून, आणि वृत्तपत्रामधून सामाजिक प्रबोधन झाले आहे. ते साहित्य अण्णाभाऊ साठे यांनी वाचले होते. या पुस्तकानी समाजिक न्यायासाठी आणि समतेसाठी लढणाऱ्या अण्णाभाऊ साठे यांना समाज सुधारणेसाठी प्रेरणा मिळाली असावी. सामाजिक परिवर्तनाची, अन्यायाविरुद्ध

लढण्याची प्रेरणा इथे दिसते. तसेच बाबासाहेबांचे स्त्री पुरुष समानतेचे तत्व अण्णाभाऊंच्या साहित्यात बघायला मिळते. स्त्री शक्तीला त्यांच्या साहित्यात उच्च स्थानावर नेवून ठेवले आहे. त्यांच्या कादंबरीतील नायिका हि अत्यंत खंबीर आणि स्वाभिमानी आहे.

औपचारिक शिक्षणाचा अभाव असूनही अण्णाभाऊ साठे विपूल साहित्य निर्माण केले. त्यांचे साहित्य हिंदी, गुजराती, उडिया, बंगाली, तमीळ, मल्याळी, इंग्रजी, फ्रेंच अशा जगातील २७ भाषांमधे भाषांतरीत झालेले असून त्यांच्या अनेक कादंबऱ्यावर चित्रपट करण्यात आले आहेत.

**अण्णाभाऊ साठे यांची साहित्य संपदा**

| | |
|---|---|
| **कादंबरी लेखन** | आग, आघात, अहंकार, अग्निदिव्य, कुरूप, चित्रा, फुलपाखरू, वारणेच्या खोऱ्यात, रत्ना, रानबोका, रूपा, संघर्ष, तास, गुलाम, डोळे मोडीत राधा चाले, ठसलेल्या बंदुका, जिवंतकाडतूस, चंदनमूर्ती, मंगला, मथुरा,मास्तर, चिखलातील कमळ,अलगुज, रानगंगा माकडीचा माळ, केवड्याचं कणीस, वैजयंता, धुंद रानफुलाचा, आवडी , वारणेचा वाघ, फकीरा, वैर, पाझर, सैरसोबत |
| **कथा** | बरबाद्या कंजारी, चिरागनगरीची भूतं, निखारा, नवती, पिसाळलेला माणूस, आबी, फरारी, भानामती, लाडी, कृष्णा काठच्या कथा, खूळवाडी, गजाआड, गुऱ्हाळ, जिवंत काडतूस, ठसलेल्या बंदुका, भुताचा मळा, रानवेली, राम रावण युद्ध, भोमक्या आणि इतर कथा, वणव्याची काडी, सातारी काडतूस, स्वप्नसुंदरी, स्मशानातील सोनं, रानगा, अमृत, मास्तर |
| **पोवाडे व लावण्या** | नानकीन नगरापुढे, बर्लिनचा पोवाडा, स्टॅलिनग्राडचा पोवाडा, बंगालची हाक, पंजाब दिल्लीचा दंगा, तेलंगणाचा संग्राम, महाराष्ट्राची परंपरा, अमळनेरचे अमर हुतात्मे, मुंबईचा कामगार, काळ्याबाजाराचा पोवाडा, एकजुटीचा नेता, महाराष्ट्रावरून टाक ओवाळून काया, रवि आला लावूनी तुरा, शिवारी चला, दुनयेची दौलत सारी, माझी मैना गावावर राहिली, जग बदल घालूनी घाव, मुंबईची लावणी |
| **लोकनाट्य** | अकलेची गोष्ट, कलंत्री, बिलंदर बुडवे, शेटजीचं इलेक्शन, देशभक्त घोटाळे, निवडणुकीतील घोटाळे, बेकायदेशीर, माझी मुंबई, मूक मिरवणूक, पुढारी मिळाला, लोकमंत्र्याचा दौरा, खापऱ्या चोर, दुष्काळात तेरावा, पेंग्याचं लगीन |
| **नाट्यलेखन** | इनामदार,पेंग्याचं लगीन,सुलतान |
| **स्फुटलेखन** | युगांतर मुखपत्र |
| **प्रवासवर्णन** | माझा रशियाचा प्रवास |
| **कादंबऱ्या वर आधारित चित्रपट** | वैजयंता, आवडी, माकडीचा माळ, चिखलातील कमळ, वारणेचा वाघ, अलगुज [५] |

तक्ता न. ३

अण्णाभाऊनी जे काही लिखाण केले त्या लिखाणातून त्यांनी दलित, उपेक्षित, पिडीत, शोषित समाजाच्या व्यथा,वेदनांना वाचा फोडलेली दिसते आणि म्हणूनच त्यांच्या साहित्याच्या प्रेरणा या महात्मा फुले आणि बाबासाहेबांच्या विचारात दिसतात असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

अण्णाभाऊ यांच्यामध्ये लेखनाची कला हि अंगभूत होतीच, ती संमृद्ध वाचनाने झाली असे दिसते. मॅक्सिम गॉर्की यांचे साहित्य देखील त्यांना प्रेरणा देणारे ठरले असे ते स्वत:म्हणतात.

अण्णाभाऊ यांना एका मित्राकडून मिळालेल्या मॅक्सिम गॉर्की यांच्या अनुवादित ग्रंथाने प्रभावित केले होते. अण्णाभाऊ म्हणतात कि मॅक्सिम गॉर्की यांचे ग्रंथ वाचून माझी लेखनदृष्टीच बदलून गेली. म्हणूनच आपल्या कथा लेखनाचे गुरु त्यांनी 'मॅक्सिम गॉर्की' यांना मानले आहे.(६)

मॅक्सिम गॉर्की यांचे साहित्य देखील वास्तववादी आणि अन्याय आणि शोषणाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देणारे आहे. मॅक्सिम गॉर्की यांची "आई" हि कादंबरी प्रत्यक्ष ऐतिहासिक घटनांवर आधारलेली आहे. इ.स. १९०७ साली रशियात ती प्रसिद्ध झाली. क्रांतिकारक मानवतावादाचा प्रश्न त्यांनी या कादंबरीमध्ये मांडला आहे. पावेल आणि त्याचे मित्र कारखान्यात काम करत असताना कामगारांच्या हक्कांसाठी लढत असतात आणि त्याची आई त्याला या लढ्यात साथ देते. हे पुस्तक एका गरीब आईची, पेलागेया निलोव्हना आणि तिचा मुलगा पावेल यांच्या जीवनातील संघर्ष आहे. रशियन कामगार वर्गाच्या जीवनातील वास्तववादी चित्रण या कादंबरीमध्ये केले आहे. या काळात, पेलागेयाला अनेक अडचणीचा सामना करावा लागतो. मुलगा तुरुंगात गेल्या नंतर पोलिसांकडून होणारा त्रास, समाजात होणारी टीका तिला सहन करावी लागते तरीही, ती खंबीर राहते कामगारांना एकत्र आणते आणि त्यांना त्यांच्या हक्कासाठी लढण्यासाठी प्रोत्साहित करते. हे पुस्तक अन्याय आणि शोषणाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देते.

अण्णाभाऊ साठे यांना 'मॅक्सिम गॉर्की' यांच्या साहित्यातून लिखाणाची प्रेरणा घेतली आहे तशीच प्रेरणा कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्याकडून मिळाली आहे. कम्युनिस्ट पक्षाचे सभासद झाल्यावर श्रीपाद



अमृत डांगे भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे संस्थापक सदस्य आणि भारतीय कामगार संघटना चळवळीचे एक प्रणेते त्यांचे एक प्रसिद्ध भाषण 'वाडमय आणि जनता' हे ऐकून अण्णाभाऊ खूपच प्रभावित झाले होते. त्या भाषणात श्रीपाद अमृत डांगे म्हणाले,'तुम्ही जनतेशी एकनिष्ठ रहा. तिच्या भावना समजून घ्या व मग लिहा तिला विद्रूप करू नका'. जनतेला विद्रूप करू नका हे वाक्य अण्णाभाऊंच्या कानात रुजले, असे अण्णाभाऊ म्हणतात.(७)

अण्णाभाऊंच्या लिखाणामागे मार्क्सवादाच्या प्रेरणा देखील दिसतात. मार्क्सने समाजात केवळ दोनच वर्ग मानले शोषक आणि शोषित, 'आहे रे आणि नाही रे'. त्याच्या मते दुख आणि गरिबीला जबाबदार भांडवलशहा आहेत. भांडवलशाही चे मुळासकट उन्मूलन, हाच त्यांचा सिद्धांत. श्रीमंताकडे जी धनसंपत्ती आहे तिच्या जोरावर श्रीमंत लोक गरिबांची पिळवणूक करतात, त्यांना गुलाम बनवितात व गुलामगिरीमुळे ते दुखात व दारिद्र्यात जगतात. असे कार्ल मार्क्स म्हणतो.(८)

खाजगी मालमत्तेचा मालक हाच कामगारांच्या श्रमशक्तीच्या उत्पादनाचे जादा धन घेतो. आणि कामगारास ते जादा धन मिळत नाही असे कार्ल मार्क्स म्हणतो आणि त्यांच्या या विचारातूनच कामगार किसानशाहीचा सिद्धांत मांडला आहे . म्हणजे राज्य हे पिळल्या जाणाऱ्या वर्गाने चालवावे. याचा प्रभाव आपल्याला अण्णाभाऊ साठे यांच्या वैचारिकतेवर झालेला दिसतो तसेच वैश्विक दृष्टिकोनाचे भान त्यांना आले आणि पुढे ते त्यांच्या लिखाणातून कथा, नाटक, कादंबऱ्या या तून पाहायला मिळतो. अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्या आणि

पोवाड्यांमध्ये वारंवार वर्ग संघर्ष आणि कामगारांचे शोषण आपल्याला पाहायला मिळते. फकीरा हि कादंबरी जातिव्यवस्थे विरुद्ध आणि ब्रिटिश राजवटी विरुद्ध केलेले बंड दाखवते.

तसेच "दास कॅपिटल" हा कार्ल मार्क्स यांनी लिहिलेल्या या ग्रंथात त्यांनी भांडवलशाही व्यवस्थेची अंतर्गत रचना, कार्यपद्धती आणि तिच्यामधील विरोधाभास दाखविला आहे तसेच भांडवलशाही व्यवस्थेतील कामगारांच्या शोषणाचे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक-राजकीय समस्यांचे विश्लेषण या पुस्तकात केले आहे.

कम्युनिस्ट जाहीरनामा हा कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंगेल्स यांनी लिहिलेला एक महत्त्वाचा राजकीय दस्तावेज आहे. हा जाहीरनामा कम्युनिस्ट लीगने प्रकाशित केला आणि १८४८ मध्ये लंडनमध्ये प्रसिद्ध झाला. मार्क्स आणि एंगेल्स यांनी ऐतिहासिक भौतिकवादाच्या आधारावर समाजाचा विकास आणि बदल यांचा अभ्यास केला. त्यांच्या मते, आर्थिक संबंध (उत्पादन पद्धती) हे समाजाच्या संरचनेचे आणि इतिहासाचे मुख्य घटक आहेत. जाहीरनाम्यात असे म्हटले आहे की, इतिहासातील सर्व समाजांमध्ये वर्गसंघर्ष (उदा. भांडवलदार आणि कामगार) नेहमी अस्तित्वात असतो. भांडवलशाही कामगारांचे शोषण करते आणि समाजाला विभागते, असे त्यांचे म्हणणे आहे. जाहीरनाम्यात साम्यवादाची संकल्पना मांडली आहे. साम्यवाद म्हणजे खाजगी मालमत्तेचे उच्चाटन आणि समाजातील सर्व संसाधनांचे समान वाटप. भांडवलशाही व्यवस्थेचे रूपांतर साम्यवादी समाजात करण्यासाठी कामगारवर्गाने (सर्वहारा) क्रांती करणे आवश्यक आहे असा युक्तिवाद जाहीरनाम्यात केला आहे.



'राज्य आणि क्रांती' हे व्लादिमीर लेनिन यांचे १९१७ मध्ये प्रकाशित झालेले मार्क्सवादी सिद्धांतावर आधारित पुस्तक आहे. यात त्यांनी राज्याच्या भूमिकेवर आणि कामगारवर्गाच्या क्रांतीवर मार्क्सवादी दृष्टिकोन मांडला आहे. त्यांनी भांडवलशाही राज्यांची चिरफाड करून कामगारवर्गाच्या हुकुमशाहीची स्थापना करण्याची आवश्यकता सांगितली आहे. लेनिन यांच्या मते, भांडवलशाही समाजात, राज्य हे भांडवलदारांच्या हिताचे रक्षण करते आणि कामगारांचे शोषण करते. अण्णाभाऊ साठे यांच्या कामगार चळवळीमागे त्यांनी वाचलेल्या या पुस्तकाचा प्रभाव जाणवतो.

स्पेन मध्ये १९३६ ला जेंव्हा फॅसिझमचा उदय होऊ लागला व त्या विरोधात जो संघर्ष उभा राहू लागला.तेव्हा त्याचे वृत्तांत कम्युनिस्टांच्या पत्रात प्रकाशित होऊ लागले, तेव्हा ते वाचून व कॉम्रेडसशी चर्चा करून स्पेन मधील फॅसिझम विरोधात १९३९ साली अण्णा भाऊ साठे यांनी पहिला " स्पेनचा पोवाडा " लिहिला. ज्याचे मुंबईच्या कामगारवर्गात गिरणी कामगार युनियनतर्फे अनेक कार्यक्रम झाले व डॉ.अण्णा भाऊंची शाहिर म्हणून लोकांना प्रथम ओळख झाली आणि कौतुकही झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात फॅसिस्ट हिटलरने सोव्हिएत रशियावर आक्रमण केले असता हिटलरच्या फॅसिझमच्या विरोधात व रशियातील लाल सेनेने जी रोमहर्षक झुंज दिली त्यांचे वर्णन करणारा अविस्मरणीय " स्टॅलिनग्राडचा पोवाडा " १९४२ साली लिहिला . तसेच "मुंबईचा गिरणी कामगार" "माझी मुंबई' "बोनसच्या लढा" "लवादाचा ऐका परकार","शेटजीचे इलेक्शन ", "बेकायदेशीर " आदी. विविध गाणी, पोवाडे, लोकनाट्यातून, मालक-मजूर संबंध, भांडवली लोकशाही,

कष्टकऱ्यांचे, शेतकऱ्यांचे होणारे शोषण, फसवणुक यावर ओरखडे ओढलेत. त्यांच्या गाजलेल्या," मुंबईच्या लावणीत" ते धनिक, श्रीमंतांच्या व गरीब कष्टकर्यांच्या जगण्यातील दारुण विषमतेचे चित्रण करतात. १९३८ ते १९४३-४४ पर्यंत शाहिर अण्णा भाऊ व त्यांच्या सहकाऱ्यांनी मुंबईच्या गिरणगावात जे संप,लढे, संघर्ष सुरू होते त्याच्या पाठींब्यासाठी कला पथकाचे अनेक कार्यक्रम करुन कामगारांमध्ये जागृती करण्याचे मोठे काम केले.[९]

अण्णाभाऊ यांनी लाल बावटा कलापथकच्या माध्यमातून समाज प्रबोधन आणि जन जागृतीचे कार्य त्यांनी महाराष्ट्रभर १९४४ सालापसून केले. त्या पथकात, शाहीर द.ना. गव्हाणकर, आणि शाहीर अमर शेख देखील त्यांच्यासोबत होते. अण्णाभाऊ त्यांच्या गीतातून, आणि पोवाड्यातून कामगार वर्गात जागृती घडविण्याचे काम करत होते. कामगार चळवळ मजबूत करण्यात जसे त्यांचे महत्वाचे योगदान आहे तसेच योगदान अण्णाभाऊच्या जडणघडणीत कामगार चळवळीचे दिसते. कामगार लढयामागे मार्क्सने त्यांना प्रभावित केले होते असे दिसते. त्यांनी अनेक मोर्चे, आंदोलने आणि संमेलने, मेळावे काढून उपेक्षितांची बाजू देखील कामगारांपुढे मांडली होती. एकूणच १९६२ पर्यंतच्या काळात अण्णाभाऊ यांनी कलावंत म्हणून अधिक उंची गाठली. १९५७ साली संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी जे जन प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहभाग घेवून प्रबोधन केले. त्यांत, माझी मैना गावावर राहिली, माझ्या जीवाची होतीय काहिली' हि प्रसिद्ध लावणी आपल्याला माहितच आहे.



जुलै १९५९ ते नोव्हेंबर १९५९ या कालावधीत युगांतर या साप्ताहिकामध्ये अण्णाभाऊ साठे यांनी अनेक पुस्तकांची परीक्षणे लिहिली आहेत. त्यामध्ये फ्योदोर दोस्तोव्हस्की यांच्या, 'क्राइम अँड पनिशमेंट' चा शुक्ल यांनी केलेला 'देव जागा आहे' असा अनुवाद, गणेशलाल इंदोरी यांचा,'मानव हि ललकार " या हिंदी काव्यसंग्रहाचे परीक्षण, तसेच "कारवारचा काळूराम" हे श्री. भानू शिरधनकर यांचे पुस्तक, असत्याचे प्रयोग',सदाशिव शुक्ल यांचा कथासंग्रह, आणि श्री. नामदेव व्हटकर यांचे,'मराठीची लोककला- तमाशा ' या पुस्तकांचे परीक्षण त्यांनी केले आहे. म्हणजेच हि सर्व पुस्तके त्यांनी वाचली आहेत.

मराठीतील ज्येष्ठ साहित्यक बाबुराव बागूल यांनी अण्णाभाऊंची तुलना सुप्रसिद्ध रशियन साहित्यिक मॅक्झिम गॉर्की यांच्याशी केली आणि 'महाराष्ट्राचा मॅक्झिम गॉर्की' असा गौरव केला आहे तर प्र.के. अत्रे अण्णाभाऊ यांच्या साहित्याबद्दल म्हणतात,'अण्णाभाऊ यांचे साहित्य म्हणजे जगण्यासाठी लढणाऱ्या माणसाचे साहित्य'. अण्णाभाऊ जवळ असलेल्या अंगभूत गुणांबरोबरच त्यांनी केलेल्या वाचनाचा मोठा वाटा असलेला आपल्याला त्यांच्या वाचन सवयीवरून दिसतो. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कार्ल मार्क्स, लेनिन, मॅक्सिम गॉर्की यांची पुस्तके वाचल्याने अण्णाभाऊ यांच्या विचारसरणी आणि दृष्टीकोन यावर परिणाम झालेला दिसतो. अन्याय, गरिबी, सामाजिक विषमता. कामगार चळवळ याकडे त्यांनी अधिक जागरूकतेने पहिले. आणि त्यातून प्रेरणा घेवून समाजिक बांधिलकी जपली. अण्णाभाऊ साठे यांनी

प्र. के.अत्रे.,वि.स.खांडेकर, टॉल्स्टॉय इत्यादी अनेक लेखकांची पुस्तके वाचलेली दिसतात.

वाचन समृद्ध असेल तर लेखनही समृद्ध होते. वाचनाने कल्पनाशक्ती वाढते, दुसऱ्याच्या दुखाची जाणीव समजून घेताना मनात संवेदनशीलता जागी होते. वाचनाने माणूस घडतो,त्याचा सामाजिक दृष्टिकोन विकसित होतो, हे आपल्याला अण्णाभाऊचे साहित्य आणि कार्य बघितल्यावर समजते. इंटरनेट आणि मोबाईल च्या युगात, अनेक संसाधने उपलब्ध असतानाही वाचनाकडे डोळेझाक करणाऱ्या आजच्या पिढीला अण्णाभाऊ यांचा निरक्षरते पासून साक्षरतेचा प्रवास तसेच साक्षरतेपासून साहित्यरत्न होण्याचा प्रवास खूप प्रेरणा दायी आहे.

**निष्कर्ष**

वाटेगाव ते मुंबईचा पायी प्रवास करणारे अण्णाभाऊ १९६१ साली मुंबई ते मास्को हा प्रवास विमानाने करतात. आणि समाज परिवर्तनाचे स्वप्न, दर्जेदार साहित्य निर्माण करून पूर्ण करतात. अण्णाभाऊ साठे हे एका दुर्लक्षित, मातंग समाजातून आले होते आणि त्यांना सामाजिक भेदभावाचा देखील सामना करावा लागला.

वाचनाने अण्णाभाऊ साठे यांच्यासाठी नवीन जग निर्माण केले. संघर्षमय जीवन जगत असताना वाचनाने सामाजिक वास्तव त्यांना समजण्यास मदत झाली. क्रांतिकारी आणि पुरोगामी साहित्याच्या माध्यमातून त्यांच्यामध्ये सामाजिक न्यायाची भावना विकसित झाली तसेच त्यांच्या लेखनावर आणि कार्यावरही त्याचा प्रभाव दिसतो. औपचारिक शिक्षणाचा अभाव असूनही अण्णाभाऊ साठे यांनी वाचन आणि लिखाण करून साक्षर झाले. केवळ साक्षर झाले नाहीत तर मराठी



साहित्याला समृद्ध करणारे समाज परिवर्तनाचे साहित्य निर्माण करून, साहित्यरत्न झाले. अण्णाभाऊ साठे यांनी ग्रंथांच्या वाचनाबरोबरच समाजाचेही वाचन केले आणि त्यातून उपेक्षितांच्या प्रश्नांना तसेच त्यांचा संघर्षाला साहित्यातून मांडले. वाचनातून त्यांच्यामध्ये घडलेले परिवर्तन हे अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी आहे.

**संदर्भ**

कुंभार राजेंद्र, वाचनातून व्यक्तिमत्व विकास, युनिव्हर्सल प्रकाशन, २०२१,पान क्र. २६.

Paulo Freire, The Importance of the act of reading. Tr. By Loretta Slover. Journal of Education. PP. 5-11.

दुडूकनाळे राजेश्वर, विद्रोही कलावंत:अण्णाभाऊ साठे, लोकायत प्रकाशन, सातारा, २०१५, पान ९८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे निवडक वाङ:मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९८,पान.२७

दुडूकनाळे राजेश्वर, विद्रोही कलावंत:अण्णाभाऊ साठे, लोकायत प्रकाशन, सातारा, २०१५, पान १९-२१.

चौसाळकर अशोक आणि शिंदे रणधीर, संपादक, युगांतर मधील अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर, २०११, पान.नं.१६

चौसाळकर अशोक, आणि शिंदे रणधीर, संपादक, युगांतर मधील अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर, २०११, पान. नं.१५

जोशी बी आर आणि इतर, संपादक, Encyclopedia of social sciences, डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड २, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००७, पान न. १३१५

मोरे सुबोध, कष्टकऱ्यांच्या चळवळीचा पाठीराखा, महाराष्ट्र टाइम्स, १४ सप्टेंबर, २०२२

https://marathi.indiatimes.com/editorial/article/supporter-of-the-working-class- **ovement/articleshow/77311992.cms**